रविवार, 18 सप्टेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 48
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 18 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-48 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### नाथसागराचे आपत्कालीन नऊ दरवाजे उघडले

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील नाथसागर धरणामध्ये इतर धरणातून येणाऱ्या पाण्याची आवक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्यामुळे धरणाच्या आपत्कालीन दरवाजासह यावर्षी प्रथमच २७ दरवाजे खुले करण्यात आले आहेत. गोदावरी नदीत ९९ हजार ५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सोडण्याचा निर्णय पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, शाखा अभियंता विजय काकडे यांनी घेतला.

यामुळे पुन्हा एकदा गोदावरी नदी दुधडी भरून वाहत आहे. शुक्रवारी नाथसागर धरणाच्या पाणीलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग वाढू लागला. दरम्यान पाणी पातळी वाढल्यामुळे सर्वच दरवाजासह धरणाचे क्रमांक १ ते ९ असे एकूण ९ आपत्कालीन दरवाजे उघडून गोदावरी नदीमध्ये ९९ हजार ५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सोडण्यात आलेला आहे. त्यामुळे गोदावरी नदी पुन्हा एकदा दुथडी भरून वाहत असून नदी काठावरील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन स्थानिक प्रशासन तहसीलदार शंकर लाड यांनी केले आहे.

# तब्बल ७० वर्षानंतर भारतात परतले चित्ते

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कुनो नॅशनल पार्कमध्ये चित्यांना सोडले

आधुनिक केसरी न्यूज

**ग्वाल्हेर : १९५२ मध्ये चित्ते भारतातून नामशेष झाले होते. आता पुन्हा एकदा भारताची भूमी चित्यांनी भरली आहे. त्यांचे नवीन निवासस्थान मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय वन उद्यान बनले आहे. नामिबियातील आठ चित्ते आज पहाटे एका विशेष विमानातून ग्वाल्हेरच्या महाराजा विमानतळावर पोहोचले आणि त्यानंतर हे सर्व चित्ते लष्कराच्या तीन विशेष हेलिकॉप्टरने कुनो राष्ट्रीय उद्यानात नेण्यात आले. वाढदिवसानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सकाळी ११.३० च्या सुमारास लीव्हर खेचून तीन चित्ते उद्यानात सोडले. सर्व चित्ते काही दिवस विशेष बंदोबस्तात राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे. येथील हवा-पाण्याची आणि वातावरणाची सवय झाल्यानंतर त्यांना जंगलात सोडण्यात येईल.**



चित्त्यांना सोडल्यानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी नामिबिया सरकारचे आभार मानतो. हे ऐतिहासिक क्षण आहेत की आज चित्ते भारताच्या भूमीत परतले आहेत. भूतकाळ आपल्याला उज्ज्वल भविष्याची संधी देतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लीव्हर खेचून चित्त्यांना उद्यानात सोडले. लीव्हर खेचून त्यांनी आठपैकी फक्त तीनच चित्ते उद्यानात सोडले. कुनो नॅशनल पार्कचे प्रशासन उर्वरित पाच चित्ते सोडणार आहेत. चित्ता सोडल्यानंतर पंतप्रधान मोदी फोटोग्राफी करतानाही दिसले. यावेळी त्यांच्यासोबत मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, भारत या चित्त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. कुनो नॅशनल पार्कमध्ये सोडलेले चित्ते पाहण्यासाठी देशवासीयांना काही महिने वाट पाहावी लागेल. आज हे चित्ते पाहुणे म्हणून आले आहेत, त्यांना या परिसराची माहिती नाही. या चित्त्यांना कुनो नॅशनल पार्कमध्ये आपले घर बनवता यावे, यासाठी आम्हाला या चित्त्यांनाही काही महिन्यांचा वेळ द्यावा लागेल. हे दुर्दैव आहे की आम्ही १९५२ मध्ये देशातून चित्ते नामशेष झाल्याचे घोषित केले, परंतु अनेक दशकांपासून त्यांच्या पुनर्वसनासाठी कोणतेही अर्थपूर्ण प्रयत्न केले गेले नाहीत. आज स्वातंत्र्याच्या अमृतात आता देशात नव्या ऊर्जेने चित्यांचे पुनर्वसन होऊ लागले आहे. निसर्ग आणि पर्यावरणाचे रक्षण झाले की आपले भविष्यही सुरक्षित असते हे खरे आहे. विकासाचे आणि समृद्धीचे मार्गही खुले होतात, असेही शेवटी पंतप्रधान म्हणाले.

# मराठवाड्याच्या विकासासाठी शासन कटिबद्ध

## मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाडा ही पवित्र भूमी असून येथे संतांचे संस्कार, मेहनती तरुण, वाढणारे उद्योग, यासह पर्यटनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. येथील विकासाचे प्रश्न सोडविण्यसाठी आम्ही कटीबद्ध असून विविध विकास कामांसाठी शासन भरीव निधी उपलब्ध करुन देत आहे. तसेच या सर्व कामांचा यापुढे मंत्रालय स्तरावरुन नियमित आढावा घेतला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली. मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठी विविध विकास कामांच्या घोषणाही मुख्यमंत्र्यांनी आज केल्या.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित् मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते येथील सिद्धार्थ उद्यानात आज ध्वजारोहण करण्यात आले. या निमित्ताने मुक्तिसंग्रामाचा अमृत महोत्सवी वर्षासही आज सुरूवात झाली. या कार्यक्रमास केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार सर्वश्री हरिभाऊ बागडे, संजय शिरसाट, अभिमन्यु पवार, प्रशांत बंब, विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, विशेष पोलीस महानिरीक्षक मल्लिकार्जून प्रसन्ना, पोलीस आयुक्त डॉ.निखील गुप्ता, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जीएसटीचे सहआयुक्त जी. श्रीकांत, सिडकोच्या प्रशासक दीपा मुधोळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटने यांच्यासह, अधिकारी, कर्मचारी, नागरिक



यांची उपस्थिती होती.

प्रारंभी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या. कुसुमाग्रजांच्या कवितेतील "एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार" ही ओळ उद्‌घृत करुन मुख्यमंत्री म्हणाले, अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी अशा ध्येयधुंद भावनांनी हैद्राबाद मुक्ती लढ्यासाठी जीवाची बाजी लावुन तुरुंगवास भोगला, हौतात्म्यही पत्करले अशा सर्व ज्ञात- अज्ञात स्वातंत्र्य सेनानी आणि वीरांगणांना आदरांजली अर्पण करतो. मराठवाडा मुक्तिसंग्राम हे आपल्या इतिहासातील देदीप्यमान पर्व होते. आजच्या पिढीला या इतिहासाची माहिती देणे काळाची गरज आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांचा मिळून हैद्राबाद मुक्तिसंग्राम कार्यक्रम असणार आहे. हैद्राबाद संस्थानवर निजाम मीर उस्मान अली यांचे राज्य होते. त्यांच्या राजवटीतून मुक्त होवून भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैद्राबाद संस्थानात मुक्तीसंग्राम सुरु झाला. या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदु, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे या आणि इतर अनेक नेत्यांकडे होते.मराठवाड्याच्या गावागावात हा संग्राम लढला गेला. यात जीवाची पर्वा न करता अनेक स्वातंत्र्यवीर पुढे आले. मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई म्हणून प्रसिद्ध झालेल्या बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर गावच्या दगडाबाई शेळके यांच्यासारख्या अनेक महिलांच्या योगदानाची आज आठवण होते. या लढयातील सर्व हुतात्म्यांनी आणि मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्यागाचे मोल करणे शक्य नाही असेही श्री शिंदे म्हणाले.

उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मराठवाडा मुक्तिसंग्रामातील इतिहासावर आधारित कॉफी टेबल बुक, लोगो आणि डॉ. लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या गितांची ध्वनिमुद्रिका, तसेच मंगला बोरकर यांच्या 'संघर्ष मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा' या पुस्तकाचे प्रकाशनही मुख्यमंत्यां च्या हस्ते करण्यात आले. तसेच जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत यशस्वी कामगिरी केल्याबद्दल अविनाश साबळे या क्रिडापटुला मुख्यमंत्यां च्या हस्ते तीस लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

# शिवसेनेचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच ?

## उद्धव ठाकरेंनी दिले कार्यकर्त्यांना आदेश

आधुनिक केसरी न्यूज


मुंबई : विजयादशमीनिमित्त मुंबईच्या शिवाजी पार्कवर शिवसेनेकडून दरवर्षी दसरा मेळाव्याचे आयोजन केले जाते. या मेळाव्यासाठी शिवसेनेचे हजारो कार्यकर्ते राज्यभरातून मुंबईत येतात. मात्र यावर्षी शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यावरून शिंदे गट आणि उद्धव ठाकरे समर्थकांमध्ये चढाओढ सुरू आहे. असे असताना आज शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवाजी पार्कवरील दसरा मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने जमा व्हा, असे आदेश दिले आहेत.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईतील विभाग प्रमुखाशी बैठक घेत आगामी दसरा मेळाव्यावर चर्चा केली. यावेळी शिवसेनेचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच होणार, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. याविषयी बोलताना यावर्षी होणारा दसरा मेळावा विशेष असणार आहे. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये वेगळा उत्साह आहे. मागील दोन महिन्यांपासून राज्यात ज्या घडामोडी सुरू आहेत, त्यामुळे राज्यातील आणि मुंबईतील शिवसैनिक चिडून उठलेला आहे. शिवसैनिकांच्या अंगात वेगळे तेज आलेले आहे. मात्र यावेळी उद्धव ठाकरे यांनी आजच्या बैठकीत अत्यंत संयमाची भूमिका घेतली. आपण जे काम यापूर्वी करत आलो आहोत, तेच काम करायचे आहे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले आहे, अशी माहिती शिवसेनेच्या कार्यकर्त्याने दिली.

तसेच आजच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी काय मार्गदर्शन केले, याचीदेखील माहिती शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी दिली. आज उद्धव ठाकरे यांनी उपविभागप्रमुख आणि विभाग प्रमुखांची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत महत्त्वाच्या दोन विषांयावर चर्चा करण्यात आली. यामध्ये २१ तारखेला गटप्रमुख आणि उपशाखाप्रमुख यांचा मोळावा होणार आहे. या मेळाव्यावर आजच्या बैठकीत चर्चा झाली. शिवाजी पार्कवर दरवर्षी होणाऱ्या दसरा मेळाव्यावरही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

# देवी दाक्षायणीच्या नवरात्रौत्सवाला 26 सप्टेंबरपासून प्रारंभ

## संस्थानने केली जय्यत तयारी; राज्यभरातून दर्शनासाठी येतात भाविक




आधुनिक केसरी न्यूज

गुलाब वाघ

गंगापूर : संपूर्ण मराठवाड्याची आराध्य दैवत असलेल्या लासूरगाव येथील देवी दाक्षायणीच्या नवरात्रौत्सवला 26 सप्टेंबरपाससून उत्साहात सुरुवात होणार असून नवरात्रौत्सवाची जय्यत तयारी संस्थांनाच्या वतीने पूर्ण करण्यात आली असल्याचे संस्थाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

देवी दाक्षायणीच्या नवरात्रौत्सवला 26 सप्टेंबरपासून उत्साहात सुरुवात होणार असून अश्विन शुद्ध प्रतिपदा अर्थात सोमवारी 26 सप्टेंबरला सकाळी साडे नऊ वाजता आई दाक्षायणीला वस्त्रअलंकार विधी परिधान करून घटस्थापना करून नवरात्र उत्सवला प्रारंभ होणार आहे मंगळवारी अश्विन शुद्ध द्वितीयेला मंगळवारी 27 तारखेला सकाळी नऊ वाजता सप्तशतिपाठ होणार आहे. अश्विन शुद्ध अष्ठमीला तीन ऑकटोबरला होमहवन व पूर्णाहुतीस दुपारी एक वाजता सुरुवात होणार असून सायंकाळी साडेचार पर्यंत हा विधी चालणार आहे. 4 ऑक्टोबर अश्विन शुद्ध नवमीला पहाटे पाच वाजता महाआरती होणार असून आश्विन शुद्ध दशमी अर्थात चार ऑकटोबरला विजयादशमीच्या दिवशी संध्याकाळी पाच वाजता सिमोलंघन, शमिपूजन, पानसुपारी आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हाभरासह राज्यातून भाविकांनी दर्शनाचा लाभ घेण्याचे देवी दाक्षायणी संस्थांनच्या विश्वास्तांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, संस्थांनचे अध्यक्ष कल्याण मुनोत, उपाध्यक्ष शिवाजी पाटील भिसे, सचिव आसाराम पाटील शेजूळ, विश्वस्त सर्वश्री सुभानराव देशमुख, राधेशाम शर्मा, किशोर कुलकर्णी, जगन्नाथ पाटील हरिश्चंद्रे, पदंसिद्ध विश्वस्त तथा वैजापूरचे तहसीलदार राहुल गायकवाड, देवस्थानचे व्यवस्थापक विष्णू पाटील हरिश्चंद्रे, सहाय्यक व्यवस्थापक संतोष पाटील शेलार, पुजारी प्रकाश जोशी गावकरी, संस्थानाचे इतर कर्मचारी, गावकरी व तरुण मंडळांनी देवी दाक्षायणीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## जंगलतोडीचे भीषण दुष्परिणाम

आधुनिक केसरी

या पहाडी भागातील लोक वर्षानुवर्षे परंपरेनुसार आपली शेतीची अवजारे अंगू वृक्षाच्या लाकडापासून बनवत. अंगू वृक्षाचे लाकूड वजनाला हलके पण चिवट आणि मजबूत असते. त्यामुळे या वृक्षाच्या लाकडापासून केलेली अवजारे शेतकऱ्यांना वापरण्यासाठी सोयीची असत. पण येथील वनखात्याने ही अंगूची झाडे खेळणी बनवणाऱ्या कंपनीला कराराने विकून टाकली. स्थानिक लोकांना अंगूची झाडे तोडण्यास मज्जाव केला आणि आपल्या शेतीच्या औजारांची गरज इतर वृक्षांचे लाकूड तोडून भागवावी असा अनाहूत सल्ला दिला.


१९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. आमच्या सीमाभागात सैनिकांना त्वरेने पोहोचण्यासाठी, रसद पुरवण्यासाठी तातडीने रस्ते करणे आवश्यक होते. सीमावर्ती भागात रस्ते करण्यासाठी काही



भागातील जंगल तोडणे अपरिहार्य होते. त्यामुळे बऱ्याच भागात रस्त्यांसाठी वृक्षतोड झाली. याचा दुसरा एक तोटा असा झाला की या दुर्गम भागात नागरी संस्कृतीचा सहज प्रवेश या रस्त्यांमुळे होऊ लागला. मग साहजिकच कस्तुरीमृगापासून ते दुर्मिळ वनौषधी हस्तगत करण्याची माणसांमध्ये स्पर्धा लागली. जंगले आणखीनच ओरबाडली जाऊ लागली. माणसाच्या हावरटपणाला अंत नव्हता. त्यापायी निसर्गाचा मात्र बळी जाऊ लागला.

**एक लढा असाही (भाग-2)**

याचे दुष्परिणाम लवकरच जाणवायला लागले. नद्यांना महापूर येऊन प्रचंड नुकसान व्हायला सुरुवात झाली. दरडी कोसळू लागल्या. पावसाचे ढग साधारणपणे पाच ते दहा किमी उंच अंतरावर आकाशात असतात. तेथून पडणारे पावसाचे थेंब पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे वेगाने खाली येऊ लागतात. जंगलात जेव्हा झाडांचे प्रमाण मुबलक होते तेव्हा हे वेगाने आदळणारे पावसाचे थेंब आधी झाडांची पाने झेलत. ( **क्रमशः** )




## आनंदी पहाट

## आनंदी विचार हीच यशाची गुरुकिल्ली

आधुनिक केसरी

आपल्यापैकी अनेकांना सतत भेडसावत असलेली समस्या म्हणजे एकमेकांच्या व्यवहारातील अविश्वसनीयता. आपण कितीही विश्वासाने व्यवहार केला तरीही, त्याची अंतिम परिणती काय असेल काहीच समजत नाही. आयुष्यभराची जमापुंजी वार्धक्यात उपयोगी पडावी आणि जोपर्यंत वापरावी लागत नाही तो पर्यंत चांगला परतावा येईल ह्या माफक अपेक्षेने एखाद्या खाजगी उद्योगांत, खाजगी बँकेत गुंतवणूक करण्याच्या हेतूने जमा करून ठेवावी, इतका प्रांजळ दृष्टीकोन समोर ठेवून केलेला व्यवहार विश्वसनीय ठरेलच ह्याची खात्री नसते. ह्याबाबतीत आपण अभ्यासपूर्वक विचार न केल्यामुळे अथवा भूल-थापांना बळी पडल्यामुळे आणि अधिक फायद्याचा हव्यास केल्यामुळे फसगत आणि कालांतराने पश्चाताप झाल्याची अनेक उदाहरणे आपल्याला ज्ञात असूनही आपण का बरे इतका गाफीलपणा दाखवतो? अनेकदा एकाच कुटुंबातील व्यवहारात देखील कटुता आल्याचे आणि आपापसातील वाद चव्हाट्यावर आल्याचे आपल्याला कळते. नाते आणि व्यवहार एकाच तराजूमध्ये तोलायला सुरुवात झाली कि आपापसातील व्यवहारामुळे नाती संपुष्टात आल्याचे अनेकदा आपल्याला दिसून येते. ज्या व्यक्तीला सतत शुभ, सकारात्मक, आशावादी विचार करण्याची सवय असते, त्याचे मन नेहमीच आनंदाने, उत्साहाने भरलेले राहते. अशा उत्साही मनाच्या व्यक्तीला नेहमीच यशप्राप्ती होत राहते. सकारात्मक, आशावादी, आनंदी विचार हीच यशस्वी होण्याची गुरुकिल्ली असते, ह्याची जाणीव सर्वप्रथम आपण करून घेणे आवश्यक असते. गुरुकिल्लीद्वारे आपल्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येकास आपल्यासारखेच घवघवीत यश मिळत राहण्यासाठी श्वास-विश्वास दोन्हींही महत्वाचे असते. श्वास-विश्वास एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. परस्पर नातेसंबंधातील विश्वास हा श्वासासारखाच असतो. आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत विश्वास टिकवून ठेवण्याची केवळ नैतिक जबाबदारीच नाही, तर कर्तव्य असल्याचे भान राखले पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-39

## करमणूक...

आधुनिक केसरी

लहान मुलांची करमणूक करणं अवघड असतं. कारण खूप वेळ मुलं एकाच गोष्टीत गुंतून राहत नाही. लगेच काही तरी दुसरं नवं त्यांना हवं असतं. आणि तेही त्यांच्या कलेप्रमाणे. कधीकधी खेळणी पेक्षा त्यांना स्वयंपाक घरातील भांडी जास्त आवडतात. ग्लास वाट्या एकत्र करणे. डब्याचे झाकण सतत उघडणे बंद करणे. हे फार आवडते. मुलांची करमणूक ही आपण स्वतः झाले पाहिजे. त्यांच्यासाठी आपणच करमणुकीचा अभ्यास करून त्यांना कसं हसता येईल हे शोधले पाहिजे. मुले थोडी मोठी झाली की त्यांचे करमणुकीचे फंडे बदलतात. कधी कार्टून तर कधी समवयस्क मित्रांबरोबर त्यांची करमणूक छान होते. गाणी गोष्टी समजायला लागले की तेही आवडतात. हळूहळू वाचनाची गोडी लावली पाहिजे .सुरुवातीला संस्कार गोष्टी नंतर आदर्श व्यक्ती, साहसी कथा, शूरविरांच्या कथा ,बोधपर गोष्टी ,वैचारिक कथा असं हळूहळू मुलांचे वाचन वाढवावे. वाचनामुळे भरपूर करमणूक होते. पुस्तक वाचनाची आवड असेल तर मग काही बघायलाच नको. तासनतास कसे निघून जातात कळतही नाही. ज्ञानातही भर पडते व करमणूकही होते. चित्रपट, नाटक, संगीत रजनी, काव्यसंमेलन, भजन हेही तितकेच महत्त्वाचे करमणुकीचे साधने आहेत. यापैकी कशाची तरी आवड मुलांना असावी. त्यात आणखी गायन, वादन, नृत्य, खेळ, चित्रकला, पेंटिंग ,गप्पा करणे याही गोष्टी चांगल्याच आहेत .जमलं तर थोडेफार लेखनही करू शकता. कधी पत्रलेखन सुद्धा करून बघा. सध्या तरी फक्त शाळेत पत्रलेखन होते प्रत्यक्ष जीवनात पत्रलेखन कोणीच करत नाही.चला तर मग लिहूया पत्र.....आपल्या आवडीच्या व्यक्तीला...

## अति हव्यास वाटणे हेच दु:खाचे मूळ कारण

आधुनिक केसरी

भगवंतही अति हवा हवासा वाटणे हेही दुःखाचे कारण आहे. जो कोणी या विश्वाचा चालक/मालक आहे,तो निरपेक्ष आणि भेदभाव रहित आहे. कोणी कितीही श्रीमंत असा! पुण्यवान असा! भक्तीवान असा! त्यास ईश्वर वेगळे कांहीं जास्तीचे तो देत नाही! मृत्यू देखील सर्वांनाच आहे,त्यात भेदभाव नाही. हां! तो हवा हवासा वाटणेपेक्षा, त्याने आपणांस मनुष्य जन्म दिला याबद्दल त्यांचे अंतःकरणातून त्यांचे आभार माना! त्यांचे ऋण मी फेडू शकणार नाही अशी भावना मनांत नेहमी धारणा ठेवा! पण हवा हवासा वाटतो, त्याशिवाय चैन पडत नाही, ते मात्र मनातून काढून टाका! बघा- इच्छा बाकी आहेत व मृत्यूने गाठले तर मोक्ष नाही! इच्छा व हव्यास संपलेला असणे,हीच अवस्था म्हणजे जिवंतपणीच येथेच मोक्ष स्वरूप असते....यापेक्षा वास्तव मोक्ष कोणी पाहिला आहे? हव्यास म्हणजे बंधने हो ! इच्छा विना मन हेच ईश्वराचे निवासस्थान/मंदिर आहे! ईश्वर आनंदस्वरुप आहे,असे आपण मानतो ना! आपण त्याचा अंश आहोत!म्हणून मुळ आनंदाचा अंश आपण असल्याने येथे प्रत्येकालाच आनंदाचीच ओढ असते... नाही का? एक भौतिक उदाहरण पहा!निसर्ग व भौतिक एक नियम आहे,एका दोन वस्तू एकाचवेळी राहू शकत नाहीत.या नियमहचा पडताळणी करा...व पहा... पाण्यात तांब्या त्याचे तोंडाकडून बुडवा तो बुडत नाही!कारण त्यात हवा आहे! तो कानडा करुन पाण्यात बुडवा तो बुडतो! कारण तांब्या तील हवेतला बाहेर पडता आले !हवा बाहेर गेली की पाणी आंत शिरलं.म्हणेज एका जागेत एकावेळी दोन वस्तू राहू शकत नाहीत. तसेच मनांचे आहे, इच्छा,हव्यास याने मन भरलेले असेल तर तेथे ईश्वराचे येणे शक्य नाही!म्हणून निष्काम भक्ती श्रेष्ठ समजली जाते. बघा संतांचा उपदेश ही हेच सांगतो.

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण ।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ॥१॥
मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली ।
मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥ध्रु.॥
मन गुरू आणि शिष्य । करी आपुलें चि दास्य ।
प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ॥२॥
साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ।
नाहीं नाहीं आनुदैवत । तुका म्हणे दुसरें ॥३।।

**-जगतगुरु संत तुकाराम महाराज**

## सत्पुरुषाची लक्षणे



आधुनिक केसरी

जो पुष्कळांना मनापासून आवडतो तो मनुष्य चांगला; असा मनुष्य अजरामर होतो. तो निःस्वार्थीपणाने राहून मनावर संयम ठेवतो. स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याला बुडविण्याचा दुष्टपणा त्याच्याकडून होणेच शक्य नाही. असा सत्पुरुष म्हाताऱ्याला म्हातारा, पुरुषाला पुरुष, बाईला बाई, मुलाला मुलासारखा दिसतो; म्हणजेच, जो ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे त्याचे त्याच्याशी वर्तन असते. असा मनुष्य कोणाविषयी काही निंदा किंवा स्तुती बोलत नाही. मान घ्यायला योग्य असूनही मानाची अपेक्षा तो करीत नाही. स्वतःच्या विकारांवर त्याचा पूर्ण ताबा असतो आणि दुसऱ्यांच्या दुःखात तो त्यांना सुख देण्याचा प्रयत्न करीत असतो. तो सहजावस्थेत राहतो; म्हणजेच उपाधीमुळे बांधला जात नाही. असा योगी मनुष्य खरोखरच मुक्त समजावा. अशा लोकांनाच संत म्हणतात; आणि ते जी जी कर्मे करतात, ती ती भगवंताच्या प्रेरणेनेच आणि भगवंतासाठीच असल्यामुळे, त्या कर्मांच्यापासून जगाचे कल्याण घडते. संतांच्या प्रत्येक कर्मामध्ये तुम्हाला प्रेम, दया, परोपकार, निःस्वार्थीपणा आणि भगवंताची निष्ठा याच गोष्टी आढळून येतील. अंतरंग ओळखायला स्वतःपासून सुरुवात करावी. माझे चुकते कुठे हे पाहावे. दुःख भोगण्याची मला पाळी आली, म्हणजे मार्ग चुकला म्हणावे. ज्याला सुखदुःख बाधत नाही तोच खरा समाधानी. ‘ मी रोज नामस्मरण करतो, चार वर्षे माझे भजन नाही चुकले,’ असे आपण म्हणतो; पण ‘ मी हे सर्व करतो ’ अशी सारखी आठवण ठेवली तर काय उपयोग ? मी मेहनत घेतो पण थोडक्यात नासते, ते या अभिमानामुळे. जोपर्यंत अभिमान सोडून भगवंताचे स्मरण मी करीत नाही तोपर्यंत ते ‘ स्मरण ’ कसे म्हणावे ? भगवंताशिवाय इतर जाणीव ठेवून, मी त्याच्याशी अनन्यपणे वागतो असे कसे म्हणता येईल ? मी तुम्हाला खरेच सांगतो, तुम्ही रामाकडे कर्तेपण द्या आणि त्याच्या इच्छेने वागा, तुमची देहबुद्धी नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. खुणेने जावे, संतांनी सांगितलेल्या मार्गाने जावे, म्हणजे मार्ग सापडतो. खरी तळमळ लागली म्हणजे मार्ग दिसतो. आणि खरी कळकळ असली म्हणजे त्यात प्रेम निर्माण होते. ‘ भगवंताने माझी आपत्ती दूर करावी,’ हे म्हणणे वेडेपणाचेच आहे. संकटे, आपत्ती आल्या म्हणून भगवंताला विसरणे हे केव्हाही योग्य नाही. देहबुद्धीचा नाश नामाच्या स्मरणात आहे खास ! नामात प्रेम येत नाही याचा विचार करीत राहिलो तर नामाचाच विसर पडतो, हे कुठे ध्यानात येते ! उगीच विचार करीत नाही बसू. समुद्र ओलांडून जाण्याकरिता रामाचे नाव घेऊन जी वीट ठेवली ती राहिली, हे लक्षात ठेवा.

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## पुरोहित

आधुनिक केसरी

विघ्नेश शिरगुरकर

मी पदवीच्या तिसऱ्या वर्षाला असताना गणेशपुरीत राहायचो. तर दररोज न चुकता गणेशपुरीतल्या गणेशमंदिरात माझी अन् प्रसिद्ध वृत्तनिवेदक अनंत केळकर (निवृत्त) यांची भेट व्हायची. एकदा मी त्यांच्याशी संवाद साधत होतो तर त्यांना मी सहज प्रश्न केला, "काका! पुरोहित ह्या शब्दाचा अर्थ काय?" त्यांनी मला खूप साधेपणाने या शब्दाचा अर्थ सांगितला, "जो यजमानाचं पूर्ण हित साधतो तो पुरोहित!" उद्या जर का गडगंज श्रीमंत असलेला यजमान कफल्लक झाला (अर्थात तो तसा होऊ नये ही सदिच्छा आपण बाळगावी) तरीही त्याच्या घरी जाऊन त्याच्या घरातलं जे काही कार्य असेल ते त्याच्या ऐपतीप्रमाणे आणि ऐपत नसेल तर त्याला आर्थिक बाबतीत आश्वस्त करून त्याच्या घरातील देवकार्याचं यथासांग पौरोहित्य करणे हे खऱ्या आदर्श पुरोहिताचं लक्षण आहे. यजमानाचं कार्य कोणत्याही परिस्थितीत तडीस नेणे हे कोणत्याही पुरोहिताने आपले आद्यकर्तव्य मानले पाहिजे. हिंदू धर्मात जन्म ते मृत्यू आणि ह्या मधल्या काळातील शुभ किंवा कर्तव्यकार्ये करावयाची म्हणजे प्रत्येक सश्रद्ध हिंदूचा ब्राहमण गणेश चतुर्थी म्हटली की ब्राह्मणाकडे संबंध येतो.

गणेश चतुर्थी आली म्हणजे पुरोहित आला आणि संपूर्ण पुजेचं पौरोहित्य आलं. गावागावात संपूर्ण गावातील गणपतींची जबाबदारी घेतलेले ग्रामपुरोहित ह्यांच्यासाठी हा अत्यंत आव्हानात्मक असा काळ. वर्षभर आणि अशी वर्षानुवर्षे सांभाळून ठेवलेला यजमान, त्याचा श्रावण महिना, गणेश चतुर्थी आणि दिवाळी व्यवस्थित व्हावी, त्यांची कुठेही धांदल होऊ नये व त्याचे पूर्ण हित साधले जावे ह्या हेतूने ग्रामपुरोहित धडपडत असतात. किनारी भागात आणि जिथून राष्ट्रीय व राज्य महामार्ग गेलाय अशा ठिकाणी वसलेल्या गावात तर साधारणतः हजारांहून अधिक गणपती असतात. त्या तुलनेत गोव्याच्या इतर ग्रामीण भागात तीनशे साडेतीनशेच्यावर आकडा जात नाही. पन्नासहून अधिक गणपती असले तर पुरोहितांना परप्रांतातून तेही महाराष्ट्र किंवा कर्नाटक अशा राज्यातून आणावे लागतात. ह्या प्रांतातील ब्राह्मण आता इथल्या गोव्यातल्या गणेशचतुर्थी संबंधी रूढी परंपरांना बऱ्यापैकी सरावलेले आहेत. जे नवे येतात ते स्वतःचा, पुरोहिताचा अन् यजमानाचा पुरता गोंधळ उडवून देतात. जे सरावाने हुशार असतात ते बऱ्यापैकी आघाडी सांभाळतात. एकदा का माणूस पांढरपेशा वृत्तीचा झाला की तो आपल्या पारंपारिक किंवा पिढीजात उदरनिर्वाहाकडे पाठ फिरवतो अन् ब्राह्मण समाज देखील ह्याला अपवाद राहिला नाही त्यामुळे ह्याचा थेट परिणाम गणेश चतुर्थी वा तुळसी विवाह ह्या वार्षिक सणांवर होतो.

श्रावण महिना लागला की ज्येष्ठ अन् आषाढ असे दोन महिने घरात बसुन असलेला ब्राह्मण कामानिमित्त घराबाहेर पडतो अन् श्रावण महिन्याच्या प्रतिपदेपासून तो जो कामात गढून जातो तो थेट गणेश चतुर्थी पार पडल्यानंतर निःश्वास घेतो. श्रावणात घरोघरी होणारी ब्राह्मण भोजनं, पंचगव्य शुध्दीहोम, लघुरुद्र, अभिषेक, सत्यनारायण पूजा, समाराधना, वगैरे कार्यक्रम तर जसा देवाचा वार तसे त्या त्या देवळात त्या त्या वारी उडणारी भाविकांची झुंबड ह्या सगळ्या व्यापात कोणत्याही ब्राह्मणाला स्वतःच्या घरच्या देवाची व्यवस्थित आराधना करणं वेळेअभावी आणि शारिरिकदृष्ट्या आवाक्याबाहेर असल्याकारणाने शक्य होत नाही. आपल्या घरातील शिवाची, देवीची, गणपतीची, विष्णुची, विठ्ठलाची, दत्ताची वा मारूतीची व्यवस्थित आराधना करावी तर उपाध्याय असल्याकारणाने कर्तव्य वाट पाहत असतं. सकाळचं ब्रह्मकर्म आणि घरातल्या देवाची पूजा आटोपून बाहेर पडायचं ते थेट दुपारी घरी यायचं तेसुद्धा भोजन नसेल तर, भोजन असेल तर जेवून यायचं आणि थोडी वामकुक्षी घेताच दुसऱ्या दिवशीच्या कामाची जंत्री वाट पाहत असते.

श्रावणात आपल्या घरात काहीतरी शुभकार्य किंवा कोणतं तरी पुण्यकर्म घडावं ही कोणत्याही सश्रद्ध गोवेकराची सदिच्छा असते.

गोव्यात घरोघरी बहुजन समाजात आपल्या कुलदैवताचे प्रतीक म्हणून माडावरून काळजीपूर्वक उतरवलेला आणि असोललेला नारळ ठेवण्याची भक्तिमय परंपरा आहे. पुजेच्या आरंभी श्रीफलरूपात जे गणपतीपूजन केलं जातं त्या ठिकाणी बहुदा असोललेला नारळ असतो. ह्यामागे, "नाल्ल म्हळ्यार देव, ताका शस्त्र लावप ना!" ही पवित्र आणि निरागस भावना असते. हा नारळ वर्षभर मनोभावे पुजला जातो आणि ज्यावेळी तो बदलतात त्यानंतर भक्तिभावाने त्याचं विसर्जन होतं.

भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थी म्हणजे संपूर्ण गोव्यात आणि गोव्यात गणपती असलेल्या प्रत्येक मोठ्या वा विभक्त कुटुंबात ही गडबड असते. पणजीसारख्या एरव्ही पहाटे जाग येणाऱ्या शहरात अनेक फ्लॅट आणि बंगले कुलुपबंद असतात कारण सर्वांचा लाडका बाप्पा मूळघरी येणार असतो.

कामाधंद्याच्या निमित्ताने शहरात राहणारा गोवेकर आपली 'चवथ' म्हटली की गावाकडे आनंदाने धाव घेतो. "आमचो सगळ्यांचो गणपती एकुच! आमचो गणपती अमकेकडे! आमचो गणपती एक पूण तुळस वेगळी!" असं गोवेकर अगदी आपुलकीने बोलतो. गोव्यातील गोंयकार आणि महाराष्ट्रातल्या कोकणातील कोकणी माणूस ह्यांच्यात जर का कोण जास्त उत्साही अशी स्पर्धा लागली तर नक्की कोण जिंकेल हे सांगता येणार नाही.

तर असा हा सर्वांचा लाडका बाप्पा आणि ह्याची प्रत्येक घरात पुजा अर्चा व्यवस्थितपणे व्हावी ह्यासाठी धडपडणारा ब्राह्मण मात्र स्वतःच्या घरातील गणपतीला साधी गणपत्यथर्वशीर्षाची आवर्तनेसुध्दा करायला पोहोचत नाही. ब्राह्मणांना खरंतर स्वतःचा हक्काचा असा गणपती नाहीच. संपूर्ण श्रावण महिना सकाळ संध्याकाळ कामात जातो. उरलेला वेळ उद्याच्या वा पुढच्या कामाच्या नियोजनात जातो. गणपतीला चांगली सजावट करण्यासाठी काम करणं, छानपैकी पताका लावणं, रंगीबेरंगी लाइट्स लावणं, चांगलं मखर बसवणं, गणपती बसवतात त्या खोलीत चांगला लांबच्या लांब शिवलेला पडदा लावणं वा सुंदर नक्षीचा पडदा खोलीत बसवणं हे तसं दुरापास्त काम कारण डोक्यात फक्त आणि फक्त श्रावण आणि चतुर्थी हे दोन प्रमुख उत्सव कसे निभावून न्यायचे हेच घोळत असतं. पहाटे चार साडेचार वाजेपर्यंत घरातला गणपती पूजेला लावुन बाहेर पडायचं ते थेट संध्याकाळी चार नंतर आंबलेल्या अंगाने थकून भागून घरात शिरायचं. मग अशावेळी काय करायचं? आपल्या समोर आहे तो बाप्पा आपला म्हणायचा अन् त्यालाच मनोभावे जास्वंदीसह दुर्वा वाहायची.

# सुशिक्षित बेरोजगारांचे अभिनव आंदोलन : चहा, पकोडे तळून रोष व्यक्त

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** युवक काँग्रेसच्या वतीने आज शनिवारी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस जागतिक बेरोजगार दिवस म्हणून साजरा केला. युवक काँग्रेसतर्फे महाबेरोजगारी दिनानिमित्त सुशिक्षीत बेरोजगार युवकांनी पकोडे तळून, चहा वाटप करून केले अभिनव आंदोलन केले.

महाराष्ट्रातील युवकांना रोजगाराच्या संधी देणारे उद्योगधंदे पळवून लावणा-या या महाराष्ट्र सरकारच्या विरोधात धरणे देत सुशिक्षीत बेरोजगार युवकांनी केले आंदोलन. या आंदोलनात यवतमाळ विधानसभा युवक अध्यक्ष विक्की राऊत , एनएसयूआय जिल्हाध्यक्ष कौस्तुभ शिर्के, पंचायतीराज संघटन जिल्हाध्यक्ष आशिष महल्ले, सुरज राजूरकर,राहुल वानखेडे, पंडित कांबळे, लालाजी तेलगोटे, सनी आगळे,आकाश जयस्वाल, आशिष किनकर, बाबू खडसे, शुभम भांडवले, सुरज मेश्राम, नितीन राऊत, दीपक सोनेरी, अतुल तोडसाम, सुरज कनोदे, अक्षय तिडके, योगेश तूपसुन्द्रे, दत्ता घोसाळकर, देवानंद इंगळे, अजय इंगळे, सुरज राजूरकर, दिलीप अग्रवाल, सुनील इंगळे, अंकुश इंगोले, दीपक इंगोले, रोशन मेश्राम उपस्थित होते.



# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी त्रिदल पतसंस्थेच्या सर्वसाधारण सभेने नागरिकांची मने जिंकली

आधुनिक केसरी न्यूज

**आंबेजोगाई :** येथील त्रिदल माजी सैनिक पतसंस्थेच्या 21 सर्वसाधारण सभेचे आज येथील खंदारे मंगल कार्यालय मध्ये आयोजन करण्यात आले होते असंख्य महिला पुरुष सभासदांच्या उपस्थितीमध्ये हा सर्वसाधारण सभेचा अतिशय शिस्तबद्ध नियोजनबद्ध कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमांमध्ये आमदारांमुळे थोडासा उशीर झाला खरा परंतु कार्यक्रमांमध्ये भारत पाकिस्तान भारत चीन या युद्धामध्ये तत्कालीन सहभागी असणाऱ्या शूरवीर माजी सैनिकांचा सत्कार सोहळा सुरू होताच कार्यक्रमाला अतिशय चांगल्या प्रकारे रंगत आली आणि नागरिक कार्यक्रमाला झालेला उशीर विसरून गेले सैनिकांचा कार्यक्रम म्हणून नेहमीची शिस्तप्रिय सवय असणाऱ्या सभासदांना आमदारांची वाट पाहण्यात उशीर होऊ लागल्याने वातावरण थोडेसे दखलपात्र होऊ लागले त्यातच पतसंस्थेचे सूत्रसंचालन करणारे सभासद यांनी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्या आगमन झाले असून त्यांनी आपले स्थान स्वीकार्य म्हणतात उपस्थित सभासदांचे डोळे सर्वत्र गरगरा फिरू लागले एवढेच नाही तर विद्यमान आमदार यांनी ही आपली नजर उपस्थित मंगल कार्यालय मध्ये तर काहींमध्ये या निमित्ताने हसायला पिकला परंतु वेळीच ही चूक लक्षात आल्याने सूत्रसंचालक यांनी या सूत्रताबद्ध कार्यक्रमांमध्ये आपला हातखंडा वापरून क्षमस्व मनात आमदार नमिता मुंदडा यांच्या आगमन झाले आहे असे बोलून परिस्थिती हाताळून नेली तेव्हा याही थोड्याशा अनावधानाने झालेल्या चुकीमुळे का होईना वातावरणात चांगली संगत आली.

सर्वसाधारण सभेच्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.नमिता अक्षय मुंदडा, अंबाजोगाई न.प.चे माजी उपनगराध्यक्ष आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती दिलीपराव सांगळे, जेष्ठ पत्रकार प्रा.नानासाहेब गाठाळ, सुदर्शन रापतवार, नगरसेवक संजय गंभीरे ई. मान्यवरांसह पतसंस्थेचे चेअरमन ग्यानदेवजी शेप, व्हा.चेअरमन मलवाड, सर्व संचालक, कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी नागनाथ शेप, दिलीप शेप यांच्यासह सर्वांनीच परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागनाथ शेप यांनी तर आभार प्रदर्शन मलवाड यांनी केले.




# पीएसआयने मागवलं हरणाचं मांस; दोन जणांना पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** वन विभागाच्या हद्दीतील केळीवेळी शेतशिवार परिसरात हरणाचं मांस घेऊन जाताना दोन जणांना पकडण्यात आलं होतं आणि त्यांना अटक झाली. मात्र आता वन विभागाच्या सूत्रांकडून धक्कादायक माहिती समोर आली आहे. अटकेत असलेले आरोपी हे एका पोलीस अधिकाऱ्यासाठी हरणाचं मांस घेऊन जात असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, तो पोलीस अधिकारी अमरावती इथे असल्याने ते येथे पोहोचू शकले नाही. त्यामुळे हरणाचं मांस घेण्यासाठी या ठिकाणी दुसरा पोलीस कर्मचारी ठरलेल्या पत्त्यावर आला. परंतु त्या ठिकाणी वन विभागाने आधीच कारवाई केली आणि हरणाचं मांस घेवून जाणाऱ्या दोघांना पकडले होते. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना पाहून त्या पोलिसानेही घटनास्थळावरून पळ काढला.

आरोपी कोणत्या पोलीस अधिकाऱ्यासाठी हरणाचं मांस घेऊन जात होते? हरणाचं मास घेण्यासाठी आलेला पोलीस कोण? या सर्व प्रकरणाचा तपास वन विभाग करणार का? हाही प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या संदर्भात पोलिसांकडे विचारणा करण्यात आली. या प्रकरणी संबंधित पोलिसांची विचारणा करण्यात येईल, असे पोलिसांनी कळविले आहे. आता हरणाचं मांस मागवणारा पोलीस अधिकारी समोर येईल का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

अकोला वन विभागांर्तगत येत असलेल्या ग्राम केळीवेळीच्या जवळपास असलेल्या पांढरी फाट्याजवळ शिकाऱ्याकडून हरणाचं मांस विकत घेवून दोन जण जात आहेत, अशी माहिती अकोल्याचे वनरक्षक चंदू तायडे यांना मिळाली. या माहितीच्या आधारावर त्यांनी या ठिकाणी कारवाई करून दोघांना अटक केली आहे. विजय ओंकार भटकर (वय ३०, रा. केळीवेळी, जि. अकोला) आणि प्रमोद गणपत धाडसे (वय ४४, रा. केळीवेळी, जि. अकोला) असे या दोघांची नावे आहेत. दरम्यान, वन विभागाच्या सूत्रानुसार यातील विजय भटकर याने वन विभागाच्या लोकांना सुरुवातील आपण पीएसआय आहे का? असे विचारले. त्यावर वन विभागाने म्हटले कोण पीएसआय पाहिजे अन् तुझ्याकड थैलीत काय आहे? अशी चौकशी केली. झडतीदरम्यान त्याच्याकडे हरणाचं पाच किलो मांस आढळून आलं.

वन्यप्राण्याची शिकार करणे तसेच त्याच्या मांसाची खरेदी-विक्री करणे हा गुन्हा आहे, असं असतानाही हरणाचे मांस विक्री करणाऱ्या केशव भटकर याने आत्तापर्यंत ८ हून अधिक हरणांची शिकार केल्याचं वन विभागाच्या तपासात समोर आलं आहे. ही शिकार त्याने केळीवेळी शेतशिवार परिसरात तसंच पूर्णा नदीच्या काठावर केली असून तो सध्या फरार आहे. लवकरच त्याला अटक करण्यात येईल, असं वनविभागाने म्हटलं आहे.



# पाटोदा गावातील चैतन्य नीटमध्ये चमकला

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** तालुक्यातील मौजे पाटोदा गावातील मध्यम कुटुंबातील असणा-या राजश्री शाहू कॉलेजच्या विद्यार्थी असलेल्या चैतन्य याने यावर्षीच्या 2021-2022 मधील मेडिकल NEET या परीक्षेत 550 मार्क घेत कुटुंबात नवचैतन्य निर्माण केले. चैतन्य सुनील कुलकर्णी याने हे घवघवीत यश संपादन करीत आपल्या भविष्याचा दरवाजा उघडला. त्याने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे सूर्यकांत बापू देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव अविनाश उगले, राजेभाऊ जामदार, हरीभाऊ सरवदे, अनंत देशमुख, शिवाजी पडिले, बाळासाहेब घोरपडे, राम ढोबळे, घोरपडे आदी मंडळींनी अभिनंदन केले.



# राजकारण आणि जातीय-धार्मिक समीकरणे



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**सार्वजनिक जीवनात वावरताना जात, धर्म किंवा तत्सम बाबींना प्राधान्य न देता सर्व समाज म्हणून निकोपतेने पाहणे हा आदर्शवाद झाला; परंतु जात-धर्म हे घटक एवढे प्रभावी आहेत की, ते जात-धर्म निर्मूलन करणाऱ्यांच्या मानगुटीवरून देखील उतरत नाहीत, हे वास्तव आहे. पूर्णतः अव्हेर किंवा सर्वत्र घेऊन मिरवणे या दोनच गोष्टी असतात का? बरे यातही गंमत अशी की कथित परिवर्तनवादी काही जातीय संघटना यांना जातीय संघटना म्हणता येणार नाहीत. कारण त्या जातपात मोडक मंडळाचे काम करू इच्छितात, तेही स्वतःच्या जातीय अस्मिता टिकवून. ह्या सर्वांचा भारतीय राजकारण आणि समाजकारणावर निश्चितच परिणाम होतो.**

जातीयता निर्मूलन करणाऱ्यांचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. जात हे वास्तव नसून तो आभासी आहे, भ्रम आहे असा मानणारा एक वर्ग. दुसरा मी माझी जात सोडणार नाही, किंबहुना त्याच्या आधारे काही फायदा झाला तर तो स्वागतार्हच आहे, पण समाजातून जातीयता नष्ट झाली पाहिजे, असे मानणारा दुसरा वर्ग. शेवटी जात-धर्म वास्तव असले तरी त्या गोष्टी अत्यंत खाजगी आहेत, त्या तशाच ठेऊन त्याचा परिणाम सार्वजनिक जीवनात होता कामा नये, असे मानणारा वर्ग. तिसऱ्या प्रकारातील लोक निर्मूलनापेक्षा पद्धतीवर भर देणारे ठरतात. जात असणे, ती मानणे आणि तिचा आयुधासारखा वापर करून घेणे ह्या सर्वस्वी भिन्न गोष्टी आहेत. राजकारणामध्ये सक्रीयतेने सहभागी असतात सर्वच; परंतु बोलबाला असतो तो क्रमाने पहिल्या आणि दुसऱ्या गटाचाच. भारतीय स्वातंत्र्यापासूनचा इतिहास पाहिला तर पहिल्या गटाची सतत पिछेहाट होताना दिसते आहे. त्याचे महत्त्वाचे कारण भारतीय समाजाची एक मनोभूमिका आहे, ती चूक की बरोबर नंतर ठरवा पण जी आहे ती अशी आहे, तिला सामोरे जाताना भ्रम म्हणून जाता येणार नाही, ते वास्तव स्वीकारूनच निदान करावे लागणार आहे. आमच्या शास्त्रात, पोथीत असे असे लिहिले आहे मग आम्ही तसे तसेच करणार हा हट्टाग्रह सोडल्याशिवाय निदान शक्य नाही. भारतीय राजकारणात स्वतःची झालेली पिछेहाट आणि त्याच्या कारणांची मीमांसा तर्कशुद्ध पातळीवर जाऊन आत्मपरीक्षणात्मक पद्धतीने होणार नाही, तोपर्यंत या गटास अच्छे दिन येणार नाहीत. अभ्यास, निष्ठा, निस्पृहता, तळमळ महत्त्वाची असली तरी दिशा आणि पध्दतीकडे झालेले दुर्लक्ष हानी पोहचविणारे ठरले. दुसरा वर्ग मनोरंजनात्मक आहे. शांततेसाठी युद्ध हे जसे अफलातून वाटते तसे जातीयता निर्मूलनासाठी जातीय संघटना आणि त्या माध्यमातून राजकीय रणधुमाळी असे हे चित्र आहे. या गटास बहुसंख्यांक हे जन्मतः जातीयवादी आणि स्वतःच्या जातींचा फायदा करून घेणारे वाटत असल्यामुळे आणि जातीयता घालवायची असेल तर आम्हांस एकत्र येणे गरजेचे आहे नव्हे ते निसर्गदत्त आहे, ही या गटाची भावना असते. अल्पसंख्य असणे हे गाऱ्हाणे आणि संघटन या दोन्हीसाठी फायद्याचे ठरते. या भारतात सर्वच जातसमूह अल्पसंख्य आहेत. कारण सविधांनाने अल्पसंख्य कोणास म्हणावे, हे काही निश्चित केले नाही. त्यामुळे जात-उपजात या अनुषंगाने विचार करता सर्वच अल्पसंख्य ठरतात. विशेषतः मंडल आयोगानंतर तसे ठरले हे वास्तव आहे. मी माझी जात-धर्म सोडणार नाही, परंतु समोरच्याने आपली जात दाखवता कामा नये, ही अपेक्षा गैरवाजवी आहे. आमचा रामराम म्हणायला विरोध असतो, पण सर्वसमावेशक नमस्कारही आम्ही म्हणत नाही. मोठ्या जात समूहातील व्यक्ती एकमेकांना आज नमस्कार म्हणतात पण जातीयता निर्मूलन करणाऱ्या गटास मात्र आपल्या प्रणामातूनही जातीय अभिनिवेष दूर सारावा असे वाटत नाही. त्याचा उलट परिणाम असा होतो की, जर मूठभर लोक एकत्र येऊन कसोशीने आणि आक्रमकतेने वागून राजकीय लाभ उठवत असतील तर आम्ही या ठिकाणी संख्येने जास्त आहोत, आपण का मागे रहायचे? असा प्रश्न पडून या गटासारखे बहुसंख्याकांचे वर्तन झाले तर अनागोंदी माजेल, नव्हे त्याची सुरुवात नव्वदीपासून सुरू झाली आहे. राजकारण आणि समाजसुधारणा या वेगळ्या गोष्टी आहेत असे मानले पाहिजे. राजकारणातून समाजसुधारणा ही अशक्य बाब आहे. कारण समाज सुधारणा म्हणजे राजकीय अर्थाने भौतिक सुधारणा होय. समाज भौतिक अंगाने बराचसा सुधारला देखील; परंतु मानसिक, वैचारिक अंगाने सुधारणा करण्यासाठी राजकारणाचा



## क्षितिजापल्याड

आपण वापर करू असे म्हणणे दुधखुळेपणाचे ठरेल. समाजसुधारकांच्या बोटाला धरूनच ही सुधारणा आपणास करावी लागणार आहे. समाजसुधारकांचे अध्वर्यू महात्मा जोतीबा फुले यांनी समाजसुधारणेच्या कामी स्वामी दयानंद सरस्वती यांची मदत घेतली होती. आपल्या शाळेत महर्षींचे व्याख्यान आयोजित केले होते, हा ज्ञात इतिहास आहे. वेदांकडे चला म्हणणारे महर्षी आणि वेदांची सहेतुक चिकित्सा करणारे महात्मा या दोघांनी सुधारणा हा सामायिक विचार केला होता. आम्ही मात्र तिलांजली देऊन सुधारणा करण्याचा अट्टाहास करतो आणि पदरी निराशा येते, नव्हे येणारच. ज्यांना आपण बदलू पाहतो, तो समाज आणि बदल घडवू इच्छिणारे यांतील समन्वयाच्या अभावी आजची निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. गरज आहे ती तिसरा वर्ग अधिकाधिक सक्रीय होण्याची. कारण जात-धर्म संपुष्टात आणणे शक्य नाही. असे म्हणत असताना माझ्यावर जातीयवादी असण्याचा आरोप होईलही, परंतु हजारो वर्षापासून ज्या गोष्टीला दूर करण्यासाठी अनेक महाभागांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, शेवटी त्यांचीच एक जात शिष्योत्तमांनी निर्माण केली, त्यामुळे स्वीकारण्यातून सुधारणा आणि विकास हे सूत्र वापरावे लागणार आहे.

राजकारण नेहमी अस्मितेवर चालणारी प्रक्रिया असते. अस्तित्व आणि अस्मिता यांच्यामधील पुसटशी सीमारेषा ही राजकारणाची जागा. या जागेला किती महत्त्व द्यायचे आणि एक समाज म्हणून आपापली आभूषणे आणि झुली घरात ठेवून बाहेर पडायचे हे ज्याचे त्याने ठरवावे. राजकीय पक्षांची जातीय सेल आम्हांस आणखी जातीयवादी बनविण्यास पुरेसे आहेत. आमच्या कडवटपणातच त्यांचे राजकारण मधाळ होणार आहे, हे लक्षात ठेवा. मी जातीच्या आधाराने सर्व काही मिळविण्याचा प्रयत्न करतो पण इतरांनी तसा केला तर मला खुपतो हा विरोधाभास टाळल्याशिवाय आम्ही उन्नत होणार नाहीत, हे नक्की.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# 1952 मध्ये भारतातून चित्ता झाला नामशेष



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**सर्वात वेगवान म्हणून ज्या प्राण्याची ओळख आहे, तो ठिपकेदार चित्ता भारतातून कधीचाच लुप्त झाला आहे. पण आता त्याचे पुनर्वसन निश्चित झाले असून दक्षिण आफ्रिकेतून आठ चित्ते 17 सप्टेंबरमध्ये भारतात आणले जाणार आहेत. मध्य प्रदेशातील श्योपूर जिल्ह्यात असलेल्या कुनो राष्ट्रीय उद्यानात आयात केलेले चित्ते सोडले जाणार आहेत. याबाबतचे सर्व सोपस्कार पार पडले असल्याने आता तब्बल 74 वर्षांनंतर भारतातल्या जंगलामध्ये चित्त्याची 'डरकाळी' ऐकायला मिळणार आहे.16 सप्टेंबर रोजी नामिबियाची राजधानी विंडहोक येथून आठ चित्ते भारतात आणले जातील आणि 17 सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाला जयपूर विमानतळावर पोहोचतील. यानंतर हेलिकॉप्टरमधून त्यांना कुनो येथे त्यांच्या नवीन जागेत नेले जाईल. दक्षिण आफ्रिकेतून चित्ते आणण्याचे प्रयत्न काँग्रेसच्या काळापासून म्हणजे गेल्या दहा वर्षांपासून केले जात होते.**

देशात शेवटचा चित्ता 1947 मध्ये अविभाजीत मध्य प्रदेशातील कोरिया क्षेत्रात पाहिला गेला होता. आता हा भाग छत्तीसगड राज्यात येतो. यानंतर 1952 मध्ये हा प्राणी देशातून विलुप्त झाला असल्याची घोषणा करण्यात आली होती. मध्य प्रदेशचे वनमंत्री विजय शहा यांनी सांगितलेल्या माहितीनुसार दक्षिण आफ्रिकेतून आठ चित्ते मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात आणले जाणार आहेत.त्यांच्या राहण्यासाठी या उद्यानात खास निवास योजना राबविण्यात आली आहे.

चंबळ खोऱ्यात येणारे कुनो राष्ट्रीय उद्यान जवळपास 750 चौरस किलोमीटरमध्ये विस्तारले आहे. हे उद्यान चित्त्यांच्या पुनर्वासासाठी अतिशय उत्तम असून त्यांच्या खाद्यासाठी इतर शाकाहारी प्राण्यांची मुबलकता आहे. सडपातळ आणि चपळ असलेल्या चित्त्याला शिकारीसाठी लागणारे चौसिंगा हरीण, चिंकारा, नीलगाय, सांभर, चितळ आणि सशासारखे लहान जीव मोठ्या प्रमाणात या जंगलात आहेत. चित्त्यांच्या पुनर्वासासाठी 2021-22 या आर्थिक वर्षात 14 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

चित्ता हा सर्वाधिक चपळ प्राणी आहे. गेल्या सत्तर वर्षांपासून भारतात चित्त्याची ओळख फक्त चित्रातूनच केली जात होती.

आता भारतीयांना चित्ता हा देखणा,सडपातळ आणि चपळ असलेला प्राणी प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य मिळणार आहे. सुरुवातीला आफ्रिकेतील नामिबिया या देशातून 12 चित्ते भारतात आणले जाणार होते. मात्र आता ही संख्या आठवर आली आहे. नामिबिया एकूण 50 चित्ते भारताला देण्यास तयार आहे. त्यांना मध्य प्रदेशाबरोबरच राजस्थानमधील जैसलमेर आणि गुजरातमधील जंगलांमध्ये जोपासले जाणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात उर्वरित चित्ते भारतात आणले जाणार आहेत.

यापूर्वी सत्तरच्या दशकात इंदिरा गांधी पंतप्रधान असताना इराणमधून चित्ते आणण्याची योजना आखण्यात आली होती; परंतु आणीबाणी आणून हुकूमशाहीचा अवतार धारण करू पाहणाऱ्या इंदिरा गांधींना यासंबंधातल्या अडचणी सोडवण्यास फुरसत मिळाली नाही. त्यामुळे ही योजना बारगळली. सध्याच्या घडीला इराणमध्येसुद्धा केवळ 50 चित्तेच उरले आहेत. सध्या फक्त



आफ्रिकेच्या व इराणमधल्या जंगलांतच चित्ता आढळून येतो. नामिबिया सरकार चित्त्याच्या शिकारीमुळे त्रस्त आहे. तिथे मोठ्या प्रमाणावर आणि तितक्याच वेगाने जंगलांवर अतिक्रमण होत आहे. तेथील गवताळ मैदाने नष्ट होत चालली आहेत. त्यामुळे तिथले सरकार 50 चित्ते भारताला देण्यास तयार झाले.

भारतात एकेकाळी हजारोंच्या संख्येने चित्त्याचे वास्तव होते. मोगल बादशहा अकबरच्या काळात शिकारपट्ट्यात पाच हजारांच्या आसपास चित्ते असायचे. छत्तीसगड ते कर्नाटक आणि तामीळनाडू ते पुढे केरळपर्यंतच्या विशाल जंगली पट्ट्यात चित्त्यांचे साम्राज्य होते. असे म्हटले जाते की, सरगुजाचा राजा रामानुज शरणसिंह या एकट्याने 1 हजार 368 वाघांची शिकार केली होती आणि 1968 मध्ये देशातल्या शेवटच्या चित्त्याची शिकारसुद्धा त्यांनीच केली होती, असे म्हटले जाते. चित्त्याच्या भारतात होणाऱ्या आगमनाने चित्त्याची जात नष्ट केल्याचा कलंक पुसला जाणार आहे. गेल्या 50 वर्षांत देशातल्या बालगोपाळांना चित्ता चित्रात दाखवला जात होता. आता तो प्रत्यक्षात पाहायला मिळणार आहे. चित्त्याच्या आगमनामुळे हौशी लोकांच्या पर्यटनात वाढ होण्याची शक्यता असली तरी चित्त्याच्या शिकारीचीही साशंकता टाळता येण्याजोगी नाही.चित्त्यांच्या आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याबरोबरच त्यांची शिकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागणार आहे. तज्ज्ञांनुसार चित्ता हा शब्द चित्रक या संस्कृत शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ ठिपकेदार असा होतो. भोपाळ आणि गांधीनगर येथील नवपाषाण युगातल्या गुहा चित्रांमध्येही चित्ते दृष्टीस पडतात. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) चे माजी उपाध्यक्ष दिव्या भानू सिंग यांच्या 'द एंड ऑफ अ ट्रेल-द चित्ता इन इंडिया' या पुस्तकानुसार, '1556 ते 1605 पर्यंत राज्य करणाऱ्या मुघल सम्राट अकबराकडे 1000 चित्ते होते. त्यांचा वापर काळवीट आणि चिंकाऱ्यांच्या शिकारीसाठी केला जात असे. दिव्या भानू सिंह यांच्या पुस्तकानुसार, अकबराचा मुलगा जहांगीर याने पालाच्या परगण्यात चित्तांद्वारे 400 हून अधिक काळवीट पकडले होते. शिकारीसाठी चित्त्यांची पैदास करणे आणि त्यांना बंदिवासात ठेवणे या अडचणींमुळे त्यांची संख्या घटली.दिव्या भानू सिंग यांच्या म्हणण्यानुसार, ब्रिटीशांना भारतात चित्ता पकडण्यात फारसा रस नव्हता, जरी ते अधूनमधून शिकार करत असले तरी. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस भारतीय चित्त्यांची संख्या शेकडोपर्यंत खाली आली आणि राजपुत्रांनी आफ्रिकन प्राणी आयात करण्यास सुरुवात केली. 1918 ते 1945 या काळात 200 चित्त्यांची आयात करण्यात आली. इंग्रज भारतातून निघून गेल्यानंतर आणि संस्थानांचे एकत्रिकरण झाल्यानंतर भारतीय चित्त्यांची संख्या कमी झाल्यामुळे त्यांची शिकार करण्याची प्रथाही संपुष्टात आली.

1952 मध्ये स्वतंत्र भारतातील वन्यजीव मंडळाच्या पहिल्या बैठकीत सरकारने 'त्यांच्या संवर्धनासाठी धाडसी प्रयोग करण्याचे आणि मध्य भारतातील चित्त्यांच्या संरक्षणाला विशेष प्राधान्य देण्याचे आवाहन' सुचवले होते.त्यानंतर आशियाई सिंहांच्या बदल्यात आशियाई चित्ता भारतात आणण्यासाठी 1970 मध्ये इराणच्या शाह यांच्याशी चर्चा सुरू झाली. नंतर इराणमधील आशियाई चित्त्यांची कमी झालेली संख्या आणि आफ्रिकन चित्त्यांशी त्यांचे अनुवांशिक साम्य लक्षात घेऊन आफ्रिकन चित्त्यांना भारतात आणण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढे 2009 मध्ये चित्ते देशात आणण्याचे प्रयत्न पुन्हा सुरू झाले. 2010 ते 2012 दरम्यान दहा ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात आले. मध्य प्रदेशातील कुनो नॅशनल पार्क (केएनपी) चित्ता आणण्यासाठी योग्य असल्याचे मानले होते, कारण या संरक्षित क्षेत्रात लुप्तप्राय आशियाई सिंहांना आणण्यासाठी बरेच काम केले गेले होते. त्यामुळे सोयी-सुविधाही बऱ्यापैकी तयार होत्या. चित्ता आणण्यासाठी भारताने जुलैमध्ये नामिबियासोबत करार केला होता. त्यानुसार आफ्रिकन चित्ते भारतात दाखल होत आहे. याबाबत सर्वच स्तरावर उत्साह दिसून येतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गंधाळले बोल । ज्ञानाईचे ।।



प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

आधुनिक केसरी

"ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस" अशा भक्त मार्गाने सर्वांना एकत्रित आणून भागवत धर्माचा भक्कम पाया रचणारे आणि भगवद्गीते सारख्या महान ग्रंथाच्या सातशे श्लोकावरती मराठी भाषेत नऊ हजार तेहतीस ओव्यांचं प्रदीर्घ भाष्य करून सर्व सामान्यांना ज्ञानाचे भांडार खुले करून मोक्षाचा अधिकार प्राप्त करून देणारे आणि अवघ्या विश्वाची माऊली असणारे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींनी साऱ्या विश्वाचे अध्यात्मिक, पारमार्थिक व आत्मिक कल्याण साधून मोक्षप्राप्ती मिळवून देणाऱ्या, ज्ञानाचे भांडार असलेला सर्वश्रेष्ठ ग्रंथ सार्थ श्रीज्ञानेश्वरी हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाची जयंती नुकतीच (शुक्रवार दि. १६-०९-२०२२रोजी) सर्वत्र साजरी करण्यात आली. त्यानिमित्त सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा.

संसार करून परमार्थ करावा. संसाराचा त्याग करून परमार्थ करू नका फक्त सदा सर्वकाळ कर्म करत हरिनाम घेतले तरी मोक्ष प्राप्त होऊ शकतो. अशी शिकवण माऊलींनी दिली. ते हरिपाठात म्हणतात की,

"असोनी संसारी जीव्हे वेगु करी वेदशास्त्र उभारी बाह्य सदा ||
हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी ||"

परमार्थाचा इतका सोपा मार्ग माऊलींनी आम्हाला सांगितला आहे. आम्ही मात्र संसारातच एवढे मग्न झालो की मुखाने साधे हरिनाम सुध्दा घेत नाही. परमार्थात आपली मुख्य अडचण म्हणजे आपल्या अंगी असलेला आळस. हा आळसच आपला वैरी आहे. म्हणूनच आपले नित्याचे कर्म करत करतच हरिनाम घ्यावे. ते कसे तर...
जेव्हा आळस हा आपल्या आयुष्याचा नाश करतो तेव्हा संत जनाबाईने म्हटल्याप्रमाणे 'दळीता कांडीता तुज गाईन अनंता' असच आपल्याला दैनंदिन कामकाज करत करतच हरिनाम घेऊन आत्माशुध्द करावयाचा आहे. या संसारातील मायेपासून मुक्ती पाहिजे असेल तर आपण काय करावे या विषयी सविस्तर चर्चा आज आपण सार्थ श्रीज्ञानेश्वरी जयंती निमित्त "गंधाळले बोल ज्ञानाईचे" या अभंग रचनेत करणार आहोत.

**हाती सदा काम | मुखी हरिनाम ||**
**भजे आत्माराम | सर्वकाळ ||१||**

मित्रांनो, आज आपल्याकडे इतर कामे करण्यासाठी भरपूर वेळ आहे पण नामस्मरण करण्यासाठी, ध्यानधारणा, उपासना, विपश्यना करण्यासाठी मात्र अजिबात वेळ नाही. नव्हे हे सारे आपल्याला थोतांड वाटते. पण मित्रांनो एक गोष्ट लक्षात घ्या की, भौतिक सुखाबरोबरच आत्मिक सुख समाधान मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपण भौतिक सुख पैशाने सहज प्राप्त करू शकतो पण आत्मिक सुखासाठी मात्र परमार्था शिवाय दुसरा पर्याय नाही, आणि एक मात्र खरं आहे की, भौतिक सुख हे क्षणोक्षणी बदलत जातं त्याला स्थैर्य कधी लाभतच नाही. उदा. लाख रू.खर्चून महागडा टी.व्ही. घेतला पण त्याच्या रिमोट मध्ये सेल जर नसतील तर सगळ्या सुखावर पाणी फिरतं. जोपर्यंत सेल घालून रिमोट चालू करत नाही तोपर्यंत मन बेचैन, अस्वस्थ होतं. असे अनेक उदाहरणे देता येतील की, ज्यामुळे लाख मोलाचं भौतिक सुख क्षणात मातीमोल होऊन जातं. पण परमार्थिक सुखाचं मात्र तसं नाही. एकदा का हरिनामाची गोडी लागुन परमार्थिक सुख मिळू लागलं की, मग मात्र आतून मन प्रसन्न,आनंदी,सुखी होतं आणि असे सुख, आनंद हा चिरकाल टिकणारं असतो. यासाठी कुठेही धावाधाव करण्याची गरज नाही की आपला कामधंदा ही सोडण्याची गरज नाही. वर म्हटल्याप्रमाणे संत जनाबाई ही दळीता कांडीता त्या अनंताचं (पांडुरंगाचं) नाम घेऊनच अजरामर झाली. त्याप्रमाणेच आपणही हाताने सतत काम करत रहावे पण मुखाने मात्र हरिनाम घ्यावे आणि भक्तीभावाने सदासर्वकाळ मनात आत्मारामास भजत रहावे, म्हणजे आपल्यालाही ब्रह्मानंदाची प्राप्ती निश्चितच होईल. हीच आपली ध्यान धारणा, उपासना किंवा विपश्यना समजावी. त्यासाठी वेगळा वेळ देण्याची गरजच नाही शेवटी आपलं मन सुखी तर जग सुखी हेच खरं ना? म्हणूनच तुकाराम महाराज सांगता की, 'मन करा रे प्रसन्न  सर्व सिध्दीचे कारण.' किंवा 'मन चंगा तो काठवट में गंगा' म्हणतात त्याप्रमाणे मन प्रसन्न ठेवण्यासाठी परमार्थ करणे फार आवश्यक आहे. पण त्यासाठी आपल्या अंगी असणारा आळसच फार घातकी आहे. हे ध्यानात घ्यावे.

**जयाचिये अंगी | आळस भरला ||**
**त्याने नासविला | जन्म सारा ||२||**

मित्रांनो, मन प्रसन्न न होण्याचं मुख्य कारण म्हणजे आपल्या अंगात असलेला आळस! आळस हा माणासाचा वैरी आहे म्हणतात ते काही खोटे नाही. हा आळस आपल्या रोमारोमात ठासून भरलेला आहे. आपले संत कबीरजी म्हणतात की,
"कल करेसो आज कर आज करेसो अब पल में परलय हो जायेगा फिर करेगा कब?" उद्याचं काम आजच कर आणि आजचं काम आत्ता या क्षणालाच कर त्याला अजिबात विलंब करू नकोस कारण जर क्षणात महाप्रलय झाला तर ते काम तू केव्हा करशील? त्याप्रमाणे हे माझ्या जीवा (मना) ऐक, ज्याच्या अंगी आळस भरलेला आहे त्याला सदैव दुःखच प्राप्त होईल कारण या आळसानेच आमचा उभा जन्म नासवीला आहे. तेव्हा हा वैरी असलेला आळस झटकून टाक आणि आज, आत्तापासूनच हरिनाम घ्यायला सुरूकर, तरच तुझं कल्याण होईल.

सोड अभिलाषा | व्यर्थ सारी माया ||
हडळीची छाया | घात करी ||३||

परमार्थ करून जीवन सुखी करण्यासाठी पावलो पावली अनंत अडचणी येतात. त्यात सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे संसारातील "मायावी पाश" होय. जोपर्यंत हा माया मोहाचा पाश (बंधन) आपण तोडणार नाही तोपर्यंत दुःखाचा अंत होणारच नाही. आपलं जीवनच या षडरिपुंनी पूर्णतः व्यापून टाकलं आहे. नव्हे त्यांचीच सत्ता आपल्या मनावर चालते म्हणून या चरणात सांगितले आहे की, 'हे जीवा ही घातकी अभिलाषा सोड तीच्या या मायावी दुनियेत तू अडकून पडु नकोस, कारण माया प्राप्तीची जी अभिलाषा तू करतोस ती माया काही साधीसुधी नाही तर ती हडळीची (भूतीणीची) काळी छाया आहे. तीच तुझ्या आयुष्याचा सर्वनाश करेल. तेव्हा वेळीच सावध हो आणि माया,मोह,काम,क्रोध,मद,मत्सर या षडरिपूंपासून मुक्त हो आणि निस्संग, निरागस हो अगदी लहान मुला प्रमाणे. आणि ईश्वराला शरण जा. ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितलेल्या निष्कामकर्मयोगाप्रमाणे वागु लागलो तर मग काय होईल तर...

**रिकाम्या ओंजळी | मोगऱ्याचे फुल ||**
**गंधाळले बोल | ज्ञानाईचे ||४||**

या चरणावर तर मित्रांनो खूप काही सांगता येईल पण तूर्त



आपल्याला एवढच सांगतो की, जेव्हा सर्व विकारांचा त्याग केल्यानंतर एका निरागस बालकाप्रमाणे आपली वृत्ती होईल आणि आपण निष्काम कर्म (कसलीही अपेक्षा न करता)करू लागलो आणि केलेले हे निष्काम कर्म भगवंताच्या चरणी अर्पण केले तर खऱ्या अर्थाने आपण परमार्थाच्या दिशेने वाटचाल करू. तेव्हा काय होईल तर पहिल्याच पावलाला आपल्या रित्या ओंजळीत एक मोगऱ्याचे फुल पडेल आणि त्याचा परिमळ (सुगंध) इतका दरवळेल की, आपलं मन अंतर्बाह्य शुद्ध होऊन जाईल कारण हे मोगऱ्याचे फुल साधेसुधे नसून ते माझ्या ज्ञानोबा माऊलींच्या दारातील

**"ईवलेसे रोप लावीयेले द्वारी**
**त्याचा वेलु गेला गगनावारी**
**मोगरा फुलला मोगरा फुलला**
**फुले वेचिता बहरू कळीयासा आला"**

अशा माऊलींच्या दारात बहरलेल्या मोगऱ्याचे हे फुल असेल. हे एकच फुल का सांगितले आहे इथे, तर "एक तरी ओवी अनुभवावी" नुसार मोगऱ्याचे हे फुल 'ज्ञानाईचे' बोल असेल जे आपले अख्खे आयुष्यच गंधाळून टाकेल. आणि निश्चितच आपला उध्दार होईल. कारण मित्रांनो आपली 'ज्ञानाई' ही अनाथांची माय आहे. जी अंधारात ज्ञानज्योत पाजळून आपलं सारं आयुष्यच उजळून टाकेल त्या पाठोपाठ सर्व संत मंडळी देखील आपल्याला आधार देतील आणि मग या भवसागरातून आपण सहजपणे तरून जावू,

**आता तरी जीवा | होऊनी सावध ||**
**अंतरीची साद | ऐक जरा ||५||**

एवढं सगळं सांगितल्यावर हे माझ्या जीवा आता तरी सावध हो आणि तुझ्या अंतरीची साद जरा ऐक व आपला उध्दार करून घे. आजूनही वेळ गेलेली नाही. अरे ज्ञाना,नामा,जना तुका हे सर्व संत जो मार्ग दाखवतात त्याच मार्गाने चालत जा. मागचं सगळं झालं गेलं ते विसरूजा आणि आत्ता या क्षणापासून तुझं नवीन परमार्थिक जीवन सुरू कर, तुझे अंतरमन तुला साद देत आहे त्याला तू प्रतिसाद दे आणि आयुष्याचं सोनं करून टाक. आता ही संधी दवडु नको.
मित्रांनो, आज आपण खूप शिकलो,शहाणे झालो, मोठे झालो म्हणून भक्ती,भाव,परमार्थ याला कमी लेखू नये. आज हे सारे थट्टेचे विषय झाले आहेत पण मित्रांनो याशिवाय तरणोपाय नाही. आज आपण पहीलं आहे की, एका कोरोनाच्या विषाणुने सगळी मानव जातच भयभीत झाली होती. कधी श्वास बंद होईल आणि होत्याचे नव्हते होईल हे सांगता येत नव्हतन. एवढी प्रगत अमेरीकाही याच्या पुढे हतबल झाली होती, लाखो लोकांचे बळी गेले, मृत्यूचे तांडवच जणु आपल्या दारात चालू होते. आशा जीवघेण्या प्रसंगी आपली जगण्याची इच्छा शक्ती (will power) प्रबळ होणे आवश्यक आहे. त्यासाठी ही परमार्थिक शक्तीच आपल्याला जगण्याचे बळ देते. ही परमार्थिक शक्ती म्हणजे काय? तर माझ्या दृष्टीने जी नकारात्मक विचारांचा नाश करून सकारात्मक विचार वाढवते ती शक्ती म्हणजे परमार्थिक शक्ती होय. अशी शक्ती अध्यात्माने, ज्ञानेश्वरी-गाथेच्या वाचनाने, अभ्यासाने,चिंतनाने,मननाने सहज प्राप्त करता येते त्यासाठी मनाचा नर्धार आणि ईश्वरावर (विशेषतः माऊली-तकोबांसारख्या संतांवर) नितांत पण डोळस श्रद्धा असणे आवश्यक आहे. तेव्हा मित्रांनो आपण सर्वचजण डोळसपणे विचार करूया आणि आपल्यातील सद्सद् विवेक बुद्धी जागृत करून परमार्थाच्या (नामस्मरणाच्या) माध्यमातून नकारात्मक विचार जाळू या आणि सकारात्मक विचार वाढवू या आणि ह्या संसारीक दुःखापासून मुक्ती प्राप्त करू या.
आपल्या जीवनात कितीही कठीण प्रसंग आला किंवा कितीही मोठा दुःखद प्रसंग आला तरी न घाबरता अतिशय संयमाने त्याचा सामना करण्याचं आत्मिक बळ आम्हाला मिळू दे आणि आमचं जीवन खऱ्या अर्थाने सुखी,समाधानी आणि आनंदी कर एवढीच आपल्या सर्वांच्याच अंतरीची साद माउलीला व पांडुरंगाला घालतो आणि आजच्या अभंग रचनेतून त्यांच्या चरणी सर्वांच्या मांगल्याची प्रार्थना करून थांबतो.
पुन्हा एकदा श्रीज्ञानेश्वरी ग्रंथ जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

**("गंधाळले बोल ज्ञानाईचे" ही अभंग रचना प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांची आहे.)**

# शेतकरी मूलभूत हक्कापासून वंचित

आधुनिक केसरी

नमस्कार शेतकरी बांधवांना, आज आपण शेतीवर काही बोलू याविषयी नविन विषय घेऊन आलो आहे. शेतकऱ्यांना त्यांचे मुलभूत हक्क मिळणे याविषयी, आज आपला भारत देश स्वतंत्र होऊन पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. स्वतंत्र होणे म्हणजे काय हेच कळाले नाही. स्वतंत्र होवून मुलभूत हक्क मिळत नसेल तर त्याला माझ्या मते स्वतंत्र झालो असे म्हणता येणार नाही.



प्रकाश शहरवाले
कन्नड, जि. औरंगाबाद

प्रत्येक स्तरावर प्रत्येकाला मुलभूत हक्क मिळणे त्याला खरे स्वरुप प्राप्त झाले.असे म्हणता येईल.जीवन जगण्यासाठी मानवाला  अन्न वस्त्र निवारा या तिन्ही गोष्टीची गरज आहे. या तीन ही गोष्टी ज्याला प्राप्त होतात तो देश तो मानव समाज खरा स्वतंत्र आहे असे म्हणता येईल. एक उदाहरण म्हणून हा विषय काढला आहे. आपण शेतकऱ्यांचे मुलभूत हक्क काय आहे या विषयावर बोलत आहोत, शेतकऱ्यांचे मुलभूत हक्क काय आहे.1..शेतीला बारामाही पाणी मिळणे. 2.शेतात जाण्या येण्यासाठी हक्काचा रस्ता मिळणे. 3.जवळ शेतीमाल विक्रीसाठी बाजारपेठ असणे.

या तिन्ही मुलभूत हक्का पैकी एका गोष्टीची उणीव आहे तो शेतकरी आजही पारतंत्र्यात जीवन जगत आहे असे म्हणावे लागेल. आपण पहिल्या मुलभूत हक्काविषयी बोलू. शेतीला बारामाही सिंचनाची व्यवस्था असणे गरजेचे आहे. एक पाणी अभावी शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले. प्रत्येक शेतकऱ्याला जल सिंचनाचे साधन मिळाले पाहिजे. दूसरा मुलभूत हक्क..रस्ता, प्रत्येक शेतकऱ्याला शेतीच्या बांधावर शासकीय रस्ता पाहिजे. ज्या शेतकऱ्यांना शेतीसाठी रस्ता नाही तर शेतकर-यांना पिंजऱ्यातील वाघासारखे जीवन जगावे लागते. तिसरा मुलभूत हक्क म्हणजे जवळ हक्काची बाजारपेठ असणे. ज्या शेतकऱ्यांना माल पिकवून विकायला बाजारपेठ जवळ नाही. तिथल्या शेतकऱ्यांना माती-मोल भावात माल विकावा लागतो. व्यापारी वर्ग संधीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांची पिवळणूक करत असतो. आज आपण शेतकऱ्यांचा मुलभूत हक्कसाठी लढलो पाहिजे ती काळाची गरज आहे. शेतकऱ्यांनी जागे होऊन संघटीत काम करायची खरी गरज आहे. शेतकऱ्यांसारखा राजा नाही. जय जवान, जय किसान.

**लेखक स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कन्नड तालुका उपाध्यक्ष आहेत.**

# नाटक : जीवन जगण्याचा एक अविभाज्य घटक

आधुनिक केसरी

यांत्रिकीकरणामुळे माणसांमध्ये,समाजामध्ये अमुलाग्र बदल होत गेला. अनेक सोईसुविधा निर्माण झाल्या, जीवन सुसह्य झाले. अनेक शारीरिक कष्ट जे पूर्वी करावे लागत असे ते खूपच कमी झाले.लोकांना वेळ मिळू लागला आणि करमणूक तुम्हाला घरबसल्या मिळू लागली हे नाकारण्याचे काहीच कारण नाही. ओटीटी,सिरीयल,सिनेमा अगदी घरबसल्या टीव्ही वर किंवा प्रत्येकाच्या हातात असलेल्या मोबाईल वर, याचा अतिरेक म्हणा किंवा आक्रमण म्हणा काहीतरी चुकत असल्याचे जाणवू लागले.करमणूक म्हणजे फक्त सेक्स आणि क्राईम हेच आहे अशी धारणा कैक जणांची होत चालली.माणसांमधील संवाद कमी होत चालला,संवेदनशील मन हरवून गेले. त्या भावनाच नष्ट होत असल्याचे काही नाट्य कलाकार,चित्रपट कलाकार व इतर अनेक क्षेत्रात काम करत असणाऱ्यांना जाणवले.ते त्यासाठी जाणीवपूर्वक काम करत आहेत.
नाटक म्हणजे मराठी माणसांच्या जीवन जगण्याचा एक अविभाज्य घटक.नाटकाच्या माध्यमातून आपण काही करू शकू असा आत्मविश्वास असलेले हे दोन कलाकार. एक म्हणजे आरती गुप्ते,वयाने अतिशय सिनियर असल्या तरी उत्साह तसूभर कमी न झालेल्या... अनेक नाटके, सिरीयल, सिनेमा,जाहिराती मधून कायम भेटत असतात.काही जाहिराती म्हणजे वेंकटेश बिल्डकॉनटाटा मोटर्स, आयसीआयसीआय, टीव्हीएस वगैरे अनेक, मराठी नाटक"कशी आहेस तू"व इतर अनेक,चित्रपट "लाकडी घाणा", हिंदी चित्रपट मौलाना आझाद, कंडीशन अप्लाय ...
मंगेश दळवी हा कलाकार मात्र वेगळाच आहे. वरील सर्व जाणिवांना बरोबर वेगळ्या प्रकारे काम करत आहे.नाटक,चित्रपट,सिरीयल मध्ये काम करत असताना जाणवले,फक्त हे मध्यम पुरेसे नाही,त्यासाठी शिक्षण क्षेत्रात कार्यरत. ब्रिटिश कौन्सिल इंटर नॅशनल स्कूल सन्मान,वनौषधी विषयी ट्रेनिंग,रेडॅक्रोस, सेन्सस ऑफ इंडिया, नागरी सरक्षण दल या सर्व क्षेत्रात पण काम करत आहे.नाट्य चित्रकला अकादमी पुरस्कारविजेते आणि सद्ध्या चित्रपट,नाट्य विषयी शिक्षण देणाऱ्या संस्थेत उप प्राचार्य म्हणून कार्यरत...
या दोघांनी मिळून रंगझेप नावाची संस्था स्थापन केली आहे आणि त्या माध्यमांमधून कलाकृती सादर करत आहेत.सद्ध्या तीमिर हा दीर्घांक सादर करत आहेत.अतिशय अप्रतिम असा प्रयोग होतो. या दोन्ही कलाकारांचे खूप अभिनंदन...





# "के दिल अभी भरा नहीं..."

आधुनिक केसरी

**श्वासाश्वासांत भिनून अविस्मरणीय झालेल्या देवच्या गाण्यांनी साठीला पोहचलेल्या आमच्या पिढीलाच नाही तर, त्या आधीच्या व त्या नंतरच्या पिढीलाही उत्कट, तरल असं प्रेम शिकवलं, प्रेमातले रुसवे, फुगवे त्यातल्या आणाभाका रंध्रारंध्रात उतरवल्या. गाण्याची नादमधुरता जेव्हा देवच्या दुडक्या चालीत उतरायची तेव्हा नायिकेच्या मागे मागे त्याचं झुळकेगत लहरणंही गुलज़ार होवून जायचं.**

देव आनंद... असं व्यक्तिमत्व, जे चाहत्यांच्या मनात आजही नुकत्याच उमललेल्या कळीसारखं तरोताजा आहे. आणि आणखीही कित्ती वर्षं ते तसंच राहिलंही! गळ्याला स्कार्फ बांधून संपूर्ण देहात लय पेरत त्याचं ते तिरकं चालणं, समोरील केसांचा फुगा (कोंबडा) केलेली हेअर-स्टाईल, आणि त्याचं ते हटके अशा नानाविध कॅप घालणं... देवचे छंदही त्याच्या पेहराव्याइतकेच अनोखे होते.

धरमदेव पिशोरीमल आनंद म्हणून पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील शकरगड तालुक्यातला २६ सप्टेंबर १९२३चा देवचा जन्म. पण त्याची खरी ओळख पुढे देव आनंद या नावानेच ऋढ झाली. देवचे वडील पिशोरीमल हे जिल्हा न्यायालयात काम करणारे वकील होते. चार भावंडांपैकी देव हा तिसरा होता. देवचं मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण सिक्रेड हार्ट स्कूल डलहौसी येथे झालं. स्वातंत्र्यापूर्वीच्या लाहोर येथील शासकीय महाविद्यालयातून इंग्रजी साहित्यात त्याने बी.ए.ची पदवी प्राप्त केली होती. वयाच्या सतराव्या वर्षीच १९४०ला घर सोडून आलेल्या या फनकाराने आपल्या कारकिर्दीची सुरवात, चर्चगेट येथील लष्करी सेन्सॉर बोर्डच्या कार्यालयात ६५ रुपये महिन्याने केली होती. त्यावेळी त्याचा मोठा भाऊ चेतन आनंद हा, इंडियन पिपल्स थियेटर असोसिएशनचा सदस्य होता. 'अछूत कन्या' आणि 'किस्मत' चित्रपटांसाठी अशोक कुमार यांना अभिनेत्याची भुमिका देवनं एकदा पाहिलं आणि आपणही अभिनेता व्हावं असं त्याला वाटू लागलं.

कालांतराने चित्रपटसृष्टीत असलेल्या आपल्या जेष्ठ बंधू चेतन आनंद सोबत, १९४३पासून देवने काम करायला सुरुवात केली. पुण्याच्या प्रभात चित्रपट संस्थेची निर्मिती असलेला 'हम एक है" हा त्याचा पहिला चित्रपट. त्यानंतर गुरु दत्त सारख्या ग्रेट कलाकारासोबतची त्याची मैत्री ही तशी सगळ्यांच्याच परिचयाची! गुरु दत्त यांनी देव साठी निर्मिलेल्या 'जिद्दी' या चित्रपटाने यशाची पहिली पायरी त्याला दाखवली.


नवकेतन चित्रपट संस्थेची मुहूर्तमेढही त्याच वेळी रोवली गेली होती. त्या नवकेतन बॅनरखाली लगेचच आलेल्या 'अफसर' चित्रपटाने मात्र साफ निराशा केली. गुरु दत्त दिग्दर्शित, बलराज साहनी लिखित १९५१ला आलेल्या 'बाजी'ने मात्र चांगलीच बाजी मारली अन देवचं स्टार पद अढळ केलं. 'बाजी' हा त्यावेळी बॉलीवूड मधल्या शहरी गुन्हेगारी चित्रपटांचा ट्रेंड सेटर ठरला. त्या वेळेसच्या राज, दिलीप सोबत मग देवचंही नाव जोडलं जावून ते तिघंही, सिने त्रिमूर्ती म्हणून ओळखले जावू लागले.

रोमँटिक नायकाच्या भुमिका साकारता साकारता देवचं मन जडलं ते स्वर-सौंदर्याचा मिलाप अन ओठांवर प्रेमळ हासू असलेल्या सुरैय्यावर! १९४८ ते १९५१ या तीन वर्षांच्या काळात 'विद्या', 'शायर', 'जीत', 'नीली', 'अफसर', 'दो सितारे', आणि 'सनम' या सात चित्रपटांमधून दोघांची जोडी जमलीच नाही तर, दोघं एकमेकांच्या प्रेमातही पडले. मात्र भिन्न धर्माच्या आडकाठीमुळे त्यांचं प्रेम लौकिक दृष्ट्या कधीच सफल होवू शकलं नाही.

एकोणीसशे चोपन्न नंतर देव आणि कल्पना कार्तिक या जोडीचे 'आँधियाँ', 'टॅक्सी ड्राईव्हर', नौ दो ग्यारह' असे काही चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरले. याच दरम्यान त्या दोघांचं सूत जुळलं आणि लग्न करुन ते मोकळेही झाले. एकोणीसशे छपन्नला शकीला व वहिदा सोबत आलेल्या देवच्या 'सी.आय.डी.' चित्रपटाने तर कमालच केली.

## मला भावलेली सिनेरत्न

मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236



शहरातीलच नाही तर गावगल्यांमधील देवचे चाहते 'आँखों ही आँखों में...' गाणं ओठांवर मिरवू लागले. देवच्या रोमँटिक चित्रपटांचा अंदाज देव सारखाच रसिला होता. संगीत दिग्दर्शक सचिन देव बर्मन यांनी नेहमीच त्याला अप्रतिम अशी गाणी दिली. दुसरे होते ओ. पी. नय्यर... एक ग्रेट मेस्ट्रो ! त्यांचही संगीत म्हणजे लय, ताल आणि सुरांचा अनघड मिलापच होता.

देव आनंदचा तुटलेला दांत सुद्धा त्या काळी एक स्टायलिश क्रेझ ठरला होता. त्याच्या प्रेमात दिवाने झालेले चाहते आपलाही दात तसाच तोडून घ्यायचे. खरं तर; हिंदी चित्रपटसृष्टी आजही त्याच्या ऋणात आहे असं मी म्हणेन! त्या फनकारामुळेच तेव्हाचा काळ एवढा हळुवार आणि रोमँटिक होवून आठवणींच्या पानांवर चिरंजीव होवून गेला.




'पेइंग गेस्ट', 'सोलवा सावन', 'काला पानी', 'लव मेरिज़ ', 'काला बाज़ार' देवने असे कितीतरी अप्रतिम चित्रपट दिलेयेत. दिलीपच्या चेहऱ्यावरली उदासी वा राज कपूरमधला शो मॅन मला कधीच त्याच्यात दिसला नाही.

'खोया खोया चाँद खुला आसमां...' म्हणताना एका नादभऱ्या रिदमनं मान वेळावत, हात नाचवत अलकाच्या (वहिदा) मनाशी तल्लीन होणारा, 'काला बाजार' मधला रघुवीर, 'तू कहाँ ये बता...' गाताना आपल्या प्रियेच्या सुलेखच्या (नुतन) एका झलकसाठी अधिर-आतुर झालेला 'तेरे घर के सामने'तला वास्तु-विशारद राकेश, अन आपल्या अभिसारिकेला मिताला (साधना) मनसोक्त भेटूनही 'अभी ना जाओ छोड़कर...' असं आर्जव करणारा 'हम दोनों' तला महेश आनंद आजही पुन्हा पुनः बघत राहावा वाटतो. श्वासाश्वासात भिनून अविस्मरणीय झालेल्या देवच्या गाण्यांनी साठीला पोहचलेल्या आमच्या पिढीलाच नाही तर, त्या आधीच्या व त्या नंतरच्या पिढीलाही उत्कट, तरल असं प्रेम शिकवलं, प्रेमातले रुसवे, फुगवे त्यातल्या आणाभाका रंध्रारंध्रात उतरवल्या. गाण्याची नादमधुरता जेव्हा देवच्या दुडक्या चालीत उतरायची तेव्हा नायिकेच्या मागे मागे त्याचं झुळकेगत लहरणंही गुलज़ार होवून जायचं.

आमचे बाबा जवळजवळ त्याच्याच वयाचे. त्यांच्यासमोर कधी त्याचा विषय निघाला तर ते म्हणायचे -'अरे, तो काय हिरो आहे? गुंडांच्या हातचा मार खावून घेतो' हिरो म्हटला म्हणजे अमिताभसारखा एखादा अँग्री-यंग-मॅन त्यावेळी बाबांच्या मनात असावा. मला मात्र तो, सामान्यांसारखा धडपडणारा, नायिकेच्या हातून मार खाणारा आपल्यातलाच कुणीतरी एक वाटायचा. त्याच्या साधेपणातल्या त्या वास्तवतेमुळेच त्याचे चित्रपट मला आवडायचे, खरेखुरे वाटायचे.

मला अजूनही आठवतंय, दिलीप कुमार सोबतचा त्याचा 'इन्सानियत' खूप आधी मी भुसावळला पाहिला होता. त्यावेळी मी जेमतेम पंधरा वर्षांचा असेन. आम्ही भावंडं आमच्या फैजपूर गावाहून सुट्टीत भुसावळला मावशींकडे जात असू. आमचा मावसभाऊ शंकर, हा माझ्याहून जरा लहान. आम्हां दोघांना सिनेमा या पाहायची जबरदस्त आवड! इतकी की एका दिवसात आम्ही लागोपाठ तीनतीन सिनेमे पाहायचो. बारा ते तीन पांडुरंग थिएटरला, तीन ते सहा मामाजीला आणि सहा ते नऊ अमरदीप नाही तर वसंत थिएटरला. त्यानंतर मात्र आम्ही सरळ घरी यायचो, मावशींची सक्त ताकीदच होती - रात्री नऊ ते बारा पाहायचा नाही म्हणून! त्या पुढील कॉलेजच्या आयुष्यातील पाच वर्ष (१९७८-८३) जी.डी.आर्टसाठी मी औरंगाबादच्या शासकीय कला महाविद्यालयात होतो. माझी सिनेमाची आवड दोस्तांमुळे तिथंही सातव्या आस्मानवर होती. त्यावेळी मॅटिनीला देव, राज, दिलीप, बलराज साहनी, जॉय मुखर्जी, शम्मी कपूर व ज्युबलीकुमारचे सिनेमे लागायचे. औरंगाबादला तेव्हा सात थियेटरं होती. पाच वर्षाच्या तिथल्या काळात मग, 'जब प्यार किसीसे होता है', 'तीन देवियां', 'बंबई का बाबू', 'ज्वेल थीफ़', 'हम दोनों', 'असली नकली', 'माया'... देवचे खूप सारे चित्रपट पाहिले. अगदी झपाटून टाकलं होतं त्यावेळी त्याच्या सिनेमांनी आम्हाला!

देवची क्रेझ इतकी जबरदस्त होती की, फॅशन आयकॉन ठरलेल्या त्या अभिनेत्याच्या संबंधित अनेक कथा आहेत. पांढरा शर्ट आणि त्यावर काळा कोट; आपल्या या खास शैलीसाठी तो चर्चेतही राहिला. देवच्या या लूकसाठी तरुणी अक्षरशः वेड्या झालेल्या, काहींनी म्हणे आत्महत्याही केली. यामुळे कोर्टाने त्याच्या काळे कपडे घालण्यावर बंदी आणलेली. आम्ही तरुणही; त्याचा चित्रपट पाहण्यासाठी दूरदूरवरल्या थियेटरापर्यंत वेळी-अवेळी मित्रांसोबत धावपळ करायचो, गाजलेले त्याचे चित्रपट दोन, तीनदा तरी पाहून व्हायचे. तलत, रफ़ी, किशोर, हेमंत'दांनी त्याच्यासाठी गायलेली सगळीच गाणी इतकी काही सुरेख आहेत की, कोणती ऐकावी अन कोणती नाही असं होवून जावं!

एकोणीसशे त्र्याऐंशी साली नोकरीसाठी मी मुंबईला आलो. तेव्हाही घरोघरी टी.व्ही. नव्हते. देवचे सिनेमे मग भाड्याचा टी.व्ही. आणि कॅसेट घरी आणून पुन्हा पुनः पाहिले. 'तेरे मेरे सपने', प्रेम पुजारी', 'जॉनी मेरा नाम', 'गाईड'... 'गाईड'ने तर इतिहास घडवून देवला बरेचसे पुरस्कार मिळवून दिले! हा चित्रपट हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये डब करण्यात आला होता. माझ्या दोघा भावांनाही देवची गाणी आवडायची, आणि आमचा धाकटा दिलीप तर माझ्यापेक्षाही देवचा चहेता होता. उंच बांधेसूद, शोख हसीना शकीलाला 'लेके पहला पहला प्यार...' असं दर्याकिनारी ऐकवणारा 'सी.आय.डी.'तला इन्सपेक्टर शेखर, 'माना जनाब ने पुकारा नहीं...' असं गाणारा 'पेइंग गेस्ट' मधील धडपड्या वकील रमेश, 'काला पानी' मध्ये मालिका-ए-हुस्न मधुबालासोबत 'देखी सबकी यारी...' म्हणत लटकं भांडणारा करण, आणि 'ज्वेल थीफ'चा अमर नसलेला विनय कधी कुणाला विसरता येणारेय? त्या अदाकाराच्या अशा कितीतरी छबी मनाच्या गाभाऱ्यात एखाद्या शिल्पासारख्या जणू कोरल्या गेल्यायेत.

जगाच्या एक पाऊल पुढे चालणाऱ्या या कलाकारानं १९७०लाच 'द एविल विथइन' (The Evil Within) या इंग्रजी चित्रपटात मुख्य भुमिका साकारली होती. देवच्या चित्रपटांबद्दल त्याने अभिनित केलेल्या गाण्यांबद्दल लिहावं, बोलावं तेवढं कमीच! आम्हां लाखों चाहत्यांमध्येच जो गेल्या चाळीस, पंचेचाळीस वर्षांपासून दडून आहे, मग तो इहलोक सोडून गेलाय हे तरी कसं म्हणावं! वाटतं, कुतुबमिनारच्या भाग्यवान पायऱ्यांवर तो अजूनही 'दिल का भंवर करे पुकार...' म्हणत सुलेखजवळ (नुतन) आपल्या प्रेमाची कबुली देत असेल, वा आपल्या अभिसारिकेचे रेणूचे (साधना) 'तेरा मेरा प्यार अमर...' हे स्वर ऐकून, चेहऱ्यावर अभिमानाची लकेर मिरवत; चणे खात खात झोपडपट्टीतल्या एखाद्या निमुळत्या गल्लीतून अचानक आपल्या समोर येईल. नाही तर पावसाविना अकाल पडलेल्या गावात 'अल्ला मेघ दे, पानी दे...' च्या आर्त स्वरात हरवलेला राजू गाईड, एखाद्या मंदिराच्या गाभाऱ्यात परमात्म्याशी तादात्म्य पावताना दृष्टीस पडेल.

देवच्या सिनेमांमधील गीतांमध्ये जी इतकी जादू होती त्यात गीतकार, संगीतकार, दिग्दर्शक आणि देवसोबत पडद्यावर वावरणाऱ्या नायिकांचंही तितकंच अमूल्य असं योगदान होतं. एकेका फ्रेमसाठी दिग्दर्शकानं केलेली मेहनत, कृष्ण-धवल छायाचित्रणातला छाया-प्रकाशाचा सखोल-समतोल मेळ हेही वादातीत होतं. सुरैय्या, नुतन, मधुबाला आणि वैजयंती या नायिकांसोबत त्याची जोडी छानच जमली, पण देव मला जास्त भावला तो साधना आणि वहिदसोबतच! आपली बायको; कल्पना कार्तिकसोबत 'हम है राही प्यार के...' म्हणत खऱ्याखुऱ्या आयुष्यावरही त्याने अगदी भरभरुन प्रेम केलं.

दोन फिल्मफेअर, एक राष्ट्रीय, स्टार स्क्रीनचा जीवनगौरव, एव्हरग्रीन स्टार ऑफ द मिलेनियम, दादासाहेब फाळके आणि भारत सरकारचा तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार-पद्मभूषण यासह आणखीही कितीतरी मान-सन्मानाचे पुरस्कार त्याच्या नावाचा गौरव वाढवीत आहे.

खरं तर; ही मैफल देवची नव्हतीच! त्याच्या चाहत्यांना उत्साह, चैतन्य अन प्रीतीचं तरल लेणं देण्यासाठीच चुकून आला होता तो या भुलोकी! कोण म्हणतो देव गेलाय? त्याच्यावर फिल्मांकित झालेल्या कितीतरी गीतांनी, सदाबहार सिनेमांनी प्रेमाचा एक असा जहाँ तो स्थापित करुन गेलाय की, हिंदी सिनेमाच्या पडद्यावरच नाही तर लाखों चाहत्यांच्या हृदय-पटलावर उमटलेले त्याचे प्रीत ठसे कधी कधीही मिटणार नाहीत. त्याची नादमधुर गाणी कित्येकदा ऐकून, बघून, चिंतन करुन झालीये पण मन कधीच भरलं नाहीये,

'के दिल अभी भरा नहीं
दिल अभी भरा नहीं...'

संदर्भः विकिपिडीया, यु-ट्युब.

## "ऋतू पावसाळी"



ऋतू पावसाळी
मनचिंब भिजण्याचा
सप्तरंगात न्हाऊनी
ओल्या सांजवेळी
रानफुले बहरण्याचा !
ऋतू पावसाळी
पानापानांत सळसळणारा
मृदगंधासवे
हिरव्या माळरानी
शिवारं फुलवणारा !
ऋतू पावसाळी
फलवेलींत गुंफण्याचा
पाखरांच्या शाळेत
गप्पाटप्पा रंगून
फांद्यांवरी किलबिलण्याचा !
ऋतू पावसाळी
स्वैर वाऱ्यासारखा
कधी लपून छपून
मुक्त पावलांनी
हुंदडणाऱ्या हरणासारखा !
ऋतू पावसाळी
सावल्यांनी सजलेला
लुब्ध होऊनी ढगांचा
गडगडाट अन् विजांचा कडकडाट
आकाशी गर्जून आलेला !
ऋतू पावसाळी
पारंब्यात मुरणारा
कळीकळीला पागळून
मोर नाचरा जसा
डोई तोरा मिरवणारा !
ऋतू पावसाळी
नद्यानाले तुंबण्याचा
सागरी किनाऱ्यावर
लहरीविलासांत वारे
दसदिशांत घुमण्याचा !
ऋतू पावसाळी
मुसळधार सरींचा
घननाद ऐकण्याचा
गारांशी खेळण्याचा
पाऊसधारा सदा बरसण्याचा !

-प्रदीप बडदे, नवी मुंबई
मो.9594027995

## गणित भूमितीय-ताळमेळ

जीवन जगता जगता
आयुष्याचा मेळ साधावा
संसाराच्या गणिताचा
ताळमेळ सावरावा
एक अधिक वाढ करून
आनंदाची बेरीज करावी
समतोल राखण्या धीटपणे
संकटांची वजाबाकी करावी
एकाने करावा गुणाकार
तर दुज्याने भागाकार करावा
गणिताच्या सूत्रांचा
योग्य वापर करावा
सुखाची करावी वर्गवारी
दुःखाचे वर्गमूळ शोधावे
संसाराच्या गणितीय प्रश्नांचे
उत्तर बरोबरीत सोडवावे
लघू विशाल काटकोनातून
संसाराचे दृश्य पहावे
त्रिकोण चौरस चौकोनाच्या
चौकटीतच रहावे
वर्तुळातून परिघाच्या
बाहेर जाऊ नये
व्यास सांभाळून घेतांना
सूत्रे चुकवू नये
गणित भूमितीय शिक्षण
नाहीच फक्त अभ्यासाचे
उपयोगातही येते संसारात
जीवन जगताना समजून घ्यायचे

-चंद्रशेखर प्रभाकर कासार
मो. 7588318543

## ॥ किती चालावे ॥

आयुष्याची वाट
कितिक चालावे
वाकडी तिकडी
चालत राहावे ।

याच वाटेवरी
बोचतात काटे
कधी भेटी फुले
कोळसा गा साठे

वळणावरती
माणूस भेटावे
काळजात त्यांच्या
आपण शिरावे ।

येतात वादळे
मातचि करावे
वाटेवरी याच
प्रीत गाणे गावे ।

प्रा. रमेश वाघमारे
पुसद जि. यवतमाळ
मो. ९४२३१३३२५९

## आयुष्याचे गणित


आयुष्याचे गणित
अजून सुटले नाही
चिंता करून भविष्याची
बेरीज कधी झाली नाही...

संसाराची ठिगळे किती
बेरीज वजाबाकी करू कशी
टाका घालीता,घालीता
काहीच उरेना बाकी तशी...

कष्टच होते नशीबाला
आयत, चौकोनात अडकलो
वर्तुळातून बाहेर पडताना
आयुष्याचे गणित चूकलो...

गुणाकार करता,करता
वजाबाकी होत गेली
जीवनाच्या भागाकारात
बाकी मात्र शून्यच राहिली...

-सीमा मंगरूळे तवटे
वडूज सातारा




## खटारा गाडी..

गाडीचे हे जुने मॉडेल,
रहदारीला होतो अडथळा..
चल सरक हो बाजूला,
नाही तर होईल खुळखुळा....

आहेच हि जुनी गाडी,
म्हणुनच सर्व्हिस व्हॅन केली..
बंद पडते नवी गाडी,
जुनीचीच कामा येते प्रणाली....

मर्सिडीज अन् टोयाटो,
बंद पडल्या खंडाळा घाटात..
त्यांना ओढून नेले वर,
अजूनही बघा चालते थाटात....

वर वरचा हा नखरा,
काय कामाचा जाईल आब..
दृष्यावर जाऊ नको,
मजबूत आहे बघा या रुबाब....

काय बघतोस मला,
वाढले फक्त केस अन् दाढी..
गाडीचे हे जुने मॉडेल,
तरी म्हणू नको खटारा गाडी....

-सुभाष कासार, नवी मुंबई.

## बैल

घेऊन जोखड मानेला
तुडवी मातीचे ढेकूळ
राबराबूनी शेतात धन्याच्या
होई भुकेने व्याकुळ

घेऊन खांद्यावरी भार
ओढी नांगराचा फाळ
सोसून चाबकाचा मार
फुलवी ओसाड तो माळ

ओढून गाड्याचं वजन
घेई मार तो पाठीला
सारं सोसत मुक्यानं
खाई मिळेल ते थाटीला

त्यागुन सुखाच मिलन
जीवन त्याच झालं काम
ठेचलं धन्यानं वृषण
अनं मोडलं समागम

करी शेतामंधी काम
गाळी आसवं नी घाम
राबराबूनी दिसरात
नाही जीवाला आराम

तुडवी काटे आणि धस
जखमा होती मात्र मस
ओढून अन्यायाचा फाळ
होई रक्ताने घायाळ

करून शेत नी शिवार
आता सरली हयात
ठोठवी कसायाचं दार
ऐन म्हातारवयात

-मनिष आहिरे

## माय



मावळला सूर्य
अंधारलं आभाळ
अनवाणी पायांनी
माय फिरे रानोमाळ
खाचखळग्यातूनी
माय चाले भराभर
थकली भागली तरी
मोळी डोक्यावर
मीठभाकरी विना
व्याकूळला जीव
चालून थकली
दूर दिसे गाव
पक्षी परतले घरट्यात
काळोख दाटला
बाभळीला अडकूनी
जिर्न पदर फाटला
आमच्याकडे पाहून
माय विसरते दुःख
आमच्यातच शोधते
ती उद्याचं सुख

- रवींद्र व्ही. चालीकवार
संपर्क क्र. 9011559106

## भादवा...!

सरला महिना श्रावण
भाद्रपद धावत आला,
सगळा शेतीचा शिवार
चोहीकडे हिरवा झाला.
उडिद नि तीळ-मुगाची
केली कुणब्याने काढणी,
बोंडे फुटली कापसाला
करी त्यावर फवारणी.
पांढरी ज्वारी पेरल्याने
तिला फुटे कोंब हिरवा,
साऱ्या शेती-शिवारातून
भादव्याचा सुटे गारवा.
कोसळणाऱ्या पावसाने
घेतली थोडीशी उसंत,
चोहीकडे नटली सृष्टी
भादवा साऱ्यांना पसंत.
झाली पंचमी पोळा- गौरी
बप्पा गेले आपल्या घरी,
दसरा-दिवाळी हे सण
देईल साऱ्यांना उभारी...!

-अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## चिखलांचे सडे



ओल्या चिंब पावसात
सांडता चिखलांचे सडे
आमच्या रद्यांच्या भिंतींना
जाता उभ्याने तडे

गरीबीचे चटके
सोसते छत आमचे
पाणकळात होता ते गळके
पाणकळात होता ते गळके

पाऊस येई आनंद होई
मोहरतो निसर्ग
जेव्हा पाऊस पडतो डोईवरती
बहरता आनंद नसतो
सगळ्यांच्या नशिबी

खपल्या आमच्या दारिद्रींच्या
पाऊस बघा कसा खुरपतो
जखमा ओलावून आमच्या
जीव कसा चिघळवतो

पाऊस होतो जेव्हा आक्रमक
उभी रात जागावं लागत
उभ्या पायावर
रात-रात जागून
काढाव्या लागता
साचलेल्या पाण्याला
वाटा दावता-दावता

घरांच्या भिंती
छतासहित मोडता मोडता वाचत्या
पावसाळा जणू आमच्या अंगावर
आमच्या दारिद्रीच्या रेघा ओरबडतो

पशू पक्ष्याचा
अतिवृष्टीने संसार मोडतो
दर वर्षी गरीब बिचारा
त्या पावसात,
सुखाचा बिछाना शोधतो

-लक्ष्मण वाल्डे-कन्नड
मो.नं-8888606068

## माझा मराठवाडा...!




मराठवाडा भूमीचा
जयघोष सारे गाऊ,
मराठमोळ्या मातीचा
टिळा हा कपाळी लावू.

संतांची ही कर्मभूमी
नामदेव- एकनाथ,
प्रसिद्ध मंदिरे आहे
घृष्णेश्वर - नागनाथ.

पैनगांगा - गोदावरी
कयाधू इथे वाहती,
शेती हिरवी करून
पिण्यासाठी पाणी देती.

अंजिठ्याची शिल्पकला
रसिकांच्या भरे मनी,
इतिहास साक्ष देई
उभी वेरूळची लेणी.

देवगिरीचा किल्ला हा
तो शौर्यांची स्फुर्ती देई,

नांदेडचा गुरुद्वारा
शिखांना पवित्र होई.

अनेक लढवय्यांनी
निजामाला नमविले,
मराठवाडा करूनी
मुक्त समाधानी झाले...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## गणपतीचे आजारपण



आईने केले मोदक पहिल्या दिवशी एकवीस
भराभरा गणपतीने ते खाल्ले मोजून वीस

पोट खूपच भरले पाठोपाठ आले ढेकर
आई म्हणे गणूराया आता तरी पुरे कर

पाणी पिऊन बाप्पा एकदाचा थांबला
उरलेला एक मोदक मीच मग चापला

पोटामध्ये गजाननाच्या लागले की दुखायला
बोलावणे धाडले मग शेजारच्या डॉक्टरला

धावत ते आले घरी म्हणे आला होता का ताप
उच्चासनावर बसताना लागली असेल ना धाप

घामही बराच आलाय जरी बाहेर पाऊस
खाण्याची मात्र देवाला भारीच दिसते हौस

इतका कोरोना पसरलाय सगळीकडे फास्ट
गणेशाच्या सोंडेसाठी शिवून घ्यावा मास्क

घट्ट बांधून टाकला मास्क त्याच्या सोंडेला
कसे प्यावे पंचामृत प्रश्न पडला गणराजाला

डॉक्टरने टोचली सुई हळूच बोटाच्या टोकाला
रीडिंग पाहून म्हणाले, " डायबिटिस झाला याला

तीनशेच्याही वर वाढलेली दिसतेय शुगर
हलत नाही जागचा कधी सोडत नाही मखर

हिंडत फिरत जावे म्हणजे पचेल थोडेतरी
आरती ओवाळून घ्यायची फक्त तेवढी खरी

मोदकात नका घालू उद्या खोबरे अन् गूळ
नाहीतर कसे कमी व्हावे गोड खाण्याचे खूळ

नैवेद्याचे भरले ताट देऊन टाक उंदीरमामाला
म्हणजे रीडिंग उद्याचे उतरेल तरी दोनशेला "

बिचारा बाप्पा बघतच बसला बेसनलाडू
काहीच नाही खायचे म्हणून त्याला आले रडू

शेवटी उठून मी मास्कची सोडून टाकली गाठ
मोकळी झाली सोंड आता खायला लाडू आठ

भूक नाही दिवसभराची सहन होत गणरायाला
तबक ओल्या करंज्यांचे पडले त्याच्या नजरेला

करंजी लाडू मोदक पळवले सोंड तिरपी वळवून
डॉक्टर लागले बाप्पाकडे पाहू तोंड आ वासून


अशी गोष्ट घडली गणूचे नाव पडले लंबोदर
अंगचा उष्मा उतरला दुर्वा वाहिल्या डोक्यावर

प्रदक्षिणा घालतो एकच पार्वतीमाईच्या भवती
उतरेल माझी शुगर त्यामुळे म्हणाला गणपती

सगळे झाले गप्प उपाय ना कोणाचा चालला
दहा दिवस झाल्यानंतर निरोप दिला गणेशाला

-नंदिनी देशमुख

# देश भ्रष्टाचारमुक्त करणारे पंतप्रधान



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**भारताचे जगप्रिय आणि विश्व प्रसिद्ध पंतप्रधान श्री नरेंद्र दामोदरदास मोदी, यांचा आज 73 वा वाढदिवस. ते स्वतः मात्र आजही कर्तव्यपूर्तीच्या मोहीमेवर उझबेकिस्तान मध्ये एका जागतीक परिषदेत भारताचे नव्हे जगाचे नेतृत्व करायला गेले आहेत. तिथे रशियाचे अध्यक्ष पुतीन यांना भेटले. तब्बल पन्नास मिनिटे दोघे एकत्र होते. एके काळी चीन ची भिती आणि अमेरिका शी दुरावा यामुळे कॉंग्रेस शासन काळात भारत शंभर टक्के रशियावर अवलंबून होता. हगल्यामुतल्या गोष्टी आपण रशियाला विचारून करीत होतोत.**



वास्तविक भारताचे यशस्वी परंतू अत्यल्प काळ पंतप्रधान राहीलेले, आणि जय जवान जय किसान चा नारा देऊन दर सोमवारी संपूर्ण भारतीय नागरिक उपवास पाळून अन्नधान्य नासाडी आणि बचत करण्यास उद्युक्त करणारे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा ताश्कंद मध्ये मृत्यु झाला होता. या संशयास्पद मृत्यू मध्ये रशियन सरकारचाही सहभाग होता अशी वदंता आहे. ते गुढ अद्यापही कायम आहे.

तरीही रशिया सोबत आपले संबंध आजही शाबूत आहेत.

पण आपल्या निर्भीड पंतप्रधानांनी द्विपक्षीय बैठकीत पुतीन यांना रोखठोक सुनावले की ही वेळ युध्द युध्द खेळण्याची नाही. एकत्रीत सहकार्याने प्रगती साधण्याची, विकास करण्याची वेळ असून संबंध हे सौहार्दपूर्ण च असावेत. याच संमेलनात चीन चे अध्यक्ष ही उपस्थित आहेत. परंतू नरेंद्र मोदींनी त्यांना बेदखल वागणुकीतून त्यांची जागा त्यांना दाखवून देऊन दुर्लक्षित केले.



असे आपले कणखर प्रधानमंत्री जगावर राज्य करीत आहेत. आज या सिंहाचा वाढदिवस आहे. जन्मदिवस आहे. इतर राजकीय नेत्यांप्रमाणे पंतप्रधान शो बाजी करण्याचे मुड मध्ये नसतात. ते फक्त प्रत्येक निर्णय आणि प्रत्येक क्षण फक्त देशहीताचाच विचार करतात. 2014 ते आज पर्यंतचा त्यांचा सत्ताकाळ नजरेखालून घातला, त्याचे अवलोकन केले की देशात किती अद्भुत आणि उल्लेखनीय घटना घडल्यात हे लक्षात येईल.

काशी विश्वनाथ मंदीराचा भव्य जिर्णोद्धार, कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता, वाद विषय न काढता, उगाच जातीय हवा न देता वाराणशी अग्रगण्य पर्यटन क्षेत्र केले. श्रीराम मंदिर जन्मभूमीचा विषय कायदेशीर मार्गाने रक्ताचा एकही थेंब न सांडता मार्गी लावला. 2023 अखेर आयोध्येतील दिव्य रामलल्ला मंदिर उभे राहील. जे जगाचे पाठीवरील सर्वांगसुंदर आणि भव्य, कल्पक असेल.

जम्मु काश्मीर राज्याचे दोन केंद्रशासित राज्यांमध्ये विभाजन करून कलम 370 आणि 35 ए हटवले तेही रक्त न सांडता.

आता पिओके ताब्यात परत घेतल्यावरच जम्मु काश्मीर ला पून्हा पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल.

आणि लेहलढाक स्वतंत्र केंद्र शासितच राज्य राहील.

पाकव्याप्त काश्मीर चा संपूर्ण भूभाग परत घेऊन चीनने त्या भागात जी पाकिस्तान चे सहमतीने घुसखोरी आणि गुंतवणूक केलेली आहे, त्या सुधारणांसह हा भूभाग परत भारतात येईल. चीन हात चोळत बसेल. त्यांनी केलेली बेकायदा गुंतवणूक, रस्ते विकास, वगैरे भारत सरकार ताब्यात घेऊन चीनला ही धडा शिकवेल.

आज जन्मदिवस असून ही हे 72 वर्षाचे तरूण पंतप्रधान 20 वर्षाच्या तरूणांना लाज वाटेल एवढ्या क्षमतेने आणि तडफेने कार्यरत आहेत. गेल्या आठ नऊ वर्षाच्या पंतप्रधान काळात एकही सुटी न घेता आणि जेमतेम रोज फक्त दोन ते तीन तास झोप घेत अविरत काम करत आहेत. निद्रामुक्त जीवन पध्दती आत्मसात करण्याचे योगा प्रयोग त्यांचे चालू आहेत.

जर 2014 पूर्वीच किमान पाच वर्षे आधी नरेंद्र मोदी केंद्रात सत्तेवर आले असते तर आज भारत सुजलाम सुफलाम झाला असता. भ्रष्टाचारमुक्त देश म्हणून जगाचे पाठीवर उभा राहीला असता. तीन तलाक, मदरश्यांची तपासणी करून सत्यता बाहेर काढणे, वक्फ बोर्डांच्या अनिर्बंध कारभाराला चाप लावले.

फालतू लांगूलचालन थांबवण्यासाठी पाऊले उचलली आहेत.

समाज निर्भीड आणि चाणाक्ष, सजग बनवला आहे

कालच शरद पवार साहेब रडत होते. सात वर्षे झाली नोटाबंदीचा निर्णय घेऊन. पण अद्याप सहकारी बॅंकाकडील जून्या नोटा बदलून दिल्या नाहीत. त्यामुळे सहकार क्षेत्राचे खुप नुकसान झाले आहे. ज्या नोटांचा अचूक हिशेब सहकारी बॅंका देऊ शकल्या नाहीत त्या नोटा केंद्र सरकारने बदलून देण्याचे नाकारले होते.

बे हिशेबी आणि नोटबंदीच्या दिवशी रात्रभर बॅंका चालू ठेवून जमा केलेल्या नोटा आणि डे बुक मॅच होत नव्हते म्हणूनच तर त्या नोटा बदलून देण्याचे अमान्य करण्यात आले होते.

आणि हीच मंडळी ओरडत होती की नोटबंदी चा निर्णय चूकीचा होता. कोणतेही काळे धन बाहेर आले नाही. प्रत्येक जिल्हा सहकारी बॅंकेत पडून असलेल्या या बेहिशोबी नोटा आणि दहशतवाद्यांना पुरवठा होणाऱ्या बोगस नोटा चलनातून बाहेर फेकल्या गेल्या हेच तर यश आहे त्या निर्णयाचे.

गेल्या सात वर्षात जे दहशतवादी हल्ले कमी झालेत त्याचे कारणच तर हे नोटबंदी आहे. तीन तलाक पध्दतीवर कायदेशीर बंधने आणून मुस्लिम पुरूषांची मनमानी, चार चार विवाह करून स्त्रीला उपभोग्य वस्तू समजून अपत्य निर्मितीचा कारखाना समजले जायचे, वापरले जायचे बंद करून मुस्लिम महीलांना सन्मानाने जगण्याचे अधिकार मिळवून दिले. उच्च पातळीवरील भ्रष्टाचार काबुत आणला म्हणून तर पायाभूत सुविधांना पैसा कमी पडत नाही आहे. सरकारी तिजोरीत येणारा प्रत्येक रुपया या आठ नऊ वर्षात योग्य जागीच वापरला जात आहे. म्हणून तर जागतिक मंदीच्या उंबरठ्यावर उभे राहिलेले जग पाहता भारतीय अर्थव्यवस्था घौडदौड करत आहे याचे जगाला अप्रूप वाटत आहे. वाढती लोकसंख्या, जमिनीची होत असलेली रहीवासी वापरातील बदल त्यामुळे शेती खालील जमीन कमी होत असलेले प्रमाण, विस्तारवादाला कधीच प्राधान्य न देण्याचे धोरण हेच तर चीनला अंतर्मुख करत आहे. कोठेही वाद न घालता, युध्दखोर वृत्ती न दाखवता शेजारील दुश्मन देश वठणीवर आणण्याचे धोरण प्रभावी पध्दतीने वापरात आहे. परवा बांगलादेशच्या प्रमुख तीन चार दिवस भारतात येऊन गेल्या, अनेक करार केले, परंतू परत गेल्यावर चीनचे चलन देशात वापरायला परवानगी देऊन बांगलादेशच्या प्रमुखांनी डिवचले आहे. आता रोहिंग्या मुस्लिम आणि बांगलादेशी घुसखोर यांना भारत सोडावाच लागेल. ममता बॅनर्जी सारख्या अती महत्वाकांक्षी, मुसलमान धार्जीण्या मुख्यमंत्र्याला लवकरच धडा शिकवला जाईल. अरविंद केजरीवाल चे दिल्ली आणि पंजाब सरकारे डबघाईला येतील.

छोटी राज्ये निर्माण करून विकासाला चालना दिली जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना जन्मदिनाच्या शुभेच्छा देताना, त्यांचे व्हिजन पूर्णत्वास नेण्याची शक्ती परमेश्वर त्यांना देवो. दीर्घायुष्य प्रदान करो आणि पंच्चाहत्तर वर्षाचे बंधन नरेंद्र मोदींना न लागू करता 2029 पर्यंत किमान त्यांना पंतप्रधान पदावर कार्यरत राहू दे अशी इश्वर चरणी प्रार्थना करून, नरेंद्र मोदींना शुभेच्छा देतो.

# स्वाभिमान , आत्मविश्वास जागृत करणारी कादंबरी




अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**आपल्या आजुबाजुला वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वभाव, विचार वेगवेगळे आहेत. प्रत्येकाचा वेगळा दृष्टिकोन, भावनांचं प्रगटीकरण ही भिन्न असते. आयुष्य म्हणजे अनुभवांची मालिकाच असते. हे अनुभवच आपल्याला शिकवत असतात. एकदा का आपल्याला अनुभव आला मग तो चांगला असो वा वाईट मग आपण पुढील वेळी सारासार विचार करायला शिकतो. एक व्यक्ती म्हणून आपण जेव्हा समाजात वावरायला लागतो तेव्हा वेगवेगळ्या निमित्ताने अनेक माणसे या प्रवासात आपल्याला भेटतात.त्यांच्याकडून बऱ्याच गोष्टींची ओळख होते, हळूहळू त्यांचा स्वभाव समजू लागतो.. मग क्षेत्र कोणतेही असो.. पण म्हणतात ना, अनुभव आला तर बरे.. कारण एकदा का माणसाला ठेच लागली की तो पुढील वेळी चालताना सतर्क राहतो, पुन्हा ती चूक करत नाही.**

मराठी साहित्यातील अनेक आत्मचरित्रांतून लेखकाने स्वतःला आलेले अनुभव , त्यांच्या वेदना, त्यांना सहन करावा लागलेला त्रास, यांचं शब्दचित्र पुस्तकातून उतरवलं आहे. आपल्या भावनांना मुक्तपणे व्यक्त केले आहे. अशीच एक आत्मचरित्रात्मक कादंबरी वाचनात आली. लेखक सुनील पांडे लिखित 'एका लेखकाची गोष्ट' या आत्मचरित्रात्मक कादंबरीतून स्वानुभवाचे बोल शब्दबद्ध केले आहेत. कोणतीही अपेक्षा न करता निःस्वार्थपणे काम करणाऱ्या व्यक्तिची कशी अवहेलना केली जाते, स्वार्थ संपल्यानंतर त्या व्यक्तीला कसे बाजुला केले जाते, या गोष्टी लेखकाने मांडल्या आहेत.या कादंबरीतील पात्रांची नावे बदललेली असली तरी घटना आणि संवाद जसे घडले तसे दिलेले आहेत. लेखक सुनील पांडे हे अगदी तरुण वयापासून लेखन क्षेत्रात कार्यरत आहेत. वाचन आणि लेखनाची प्रचंड आवड़ असलेल्या पांडे यांची २५ पुस्तके आतापर्यंत प्रकाशित झाली असून आणखी अनेक ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. विविध साहित्यप्रकारात त्यांनी लेखन केले आहे. लेखणी हा त्यांचा श्वास आहे. एवढी पुस्तके प्रकाशित होऊनही लेखक म्हणून त्यांच्या चेहऱ्यावर किंवा त्यांच्या बोलण्यातून अहंपणाची लकेर दिसत नाही.

'एका लेखकाची गोष्ट' या आत्मचरित्रात्मक कादंबरीचं कथानक असे आहे, ही तेव्हाची गोष्ट आहे जेव्हा लेखक नुकतेच एम. ए. झाले होते आणि बेरोजगार होते. अनेक दिवाळी अंकासाठी आपलं लेखन पाठवणं, संपादकांना पत्र पाठवणं हे सर्व ते करत. साधा, सरळ , भिडस्त स्वभाव आणि मेहनत करण्याची तयारी असलेले लेखक सुनील पांडे.





प्रत्येक नवोदित लेखकांची सुरुवात अशीच होत असते. प्रत्येकाला वाटत असते, आपलं साहित्य दिवाळी अंकात , वर्तमानपत्रात प्रसिद्ध व्हावं. यासाठी सगळेच प्रयत्न करत असतात. तसेच प्रयत्न पांडे ही करत होते. गावात वाचनालय सुरु होणार असल्याने लेखक मनोमन आनंदून जातो.वाचनालयाच्या कामात हातभार लावावा, त्यामुळे आपल्याला ही छान - छान पुस्तके वाचावयास मिळतील, या शुद्ध हेतुने लेखक झटून काम करतो. आपल्या आवडीचे काम करायला का नाही आवडणार ? नाही का !..

लेखक पडेल ती कामही करू लागला , तेही कोणतीही तक्रार न करता कारण त्यांचं म्हणणं होतं, की कोणतेही सामाजिक कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी फक्त पैसा लागत नाही तर , मेहनत करण्याची, कष्ट करण्याची तयारी लागते. सचोटीने काम करणारी माणसे लागतात. पण याच साधेपणाचा स्वार्थी लोक कसे फायदा उचलतात, हे चित्र यात चित्रित केले आहे. साधी - सोपी भाषा, प्रथमपुरुषी निवेदनशैली आणि संवादाच्या माध्यमातून ही कादंबरी उलगड़त जाते. सहनशील असावे पण इतकेही नाही की समोरच्याला आपण फसवण्याची संधी प्राप्त करून द्यावी. इतरांशी चांगलं वागावं तसेच विनम्रता, प्रामाणिकपणा, परोपकारी, नितिवंत, दयावान, कनवाळू ही मूल्य माणसात असावीत पण सोबतच कणखरपणा, जशास तसे वागण्याची गरज आहे. आपण जसे आहोत तसेच जग आपल्यालाशी वागेल, असे नाही. म्हणून आपल्या स्वभावाचा, वागणूकीचा कोणी फायदा घेत असेल तर अन्याय सहन न करता समोरचायला विरोध करता यायला हवा. बऱ्याचदा प्रत्येकाला असे अनुभव आले असतील. त्यामुळे पुस्तक वाचताना प्रत्येक वाचकाला आहे स्वतःचे अनुभव वाटतात.पुस्तकाप्रमाणे माणसेही वाचता आली पाहिजे, हा मोलाचा संदेश लेखक देतात. सोशिक वृत्ती आपला घात करते. मानवी स्वभावातील विविध कंगोरे या कादंबरीत अनुभवायला मिळतात.

आयुष्य जगताना स्वाभिमान आणि आत्मविश्वासही तितकेच आवश्यक आहेत, फक्त एखाद्या गोष्टीत निपुण असणे पुरेसे नसते. आपला मान ही आपल्याला जपता आला पाहिजे. चुकीच्या गोष्टीला विरोध करता आला पाहिजे. स्नेहवर्धन प्रकाशनाने प्रकाशित केलेली ही आत्मचरित्रात्मक कादंबरी स्व-अस्मितेची , अस्तित्वाची जाणीव करून देणारी आहे. कादंबरीचे मुखपृष्ठ संतोष धोंगडे यांनी समर्पक रेखाटले आहे.डॉ. स्नेहल तावरे यांनी मलपृष्ठावर आपले विचार मांडले आहेत. ही 'एका लेखकाची गोष्ट' म्हणजे एका अनुभवसंपन्न लेखकाची कहाणी आहे, जरुर वाचा !

( एका लेखकाची गोष्ट - आत्मचरित्रात्मक कादंबरी / लेखक सुनील पांडे / स्नेहवर्धन प्रकाशन / पृष्ठसंख्या - १०० / मूल्य : १५० रुपये )




आधुनिक केसरी



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

अ) गणिताची मूलभूत संकल्पना : संख्यांचे प्रकार


20) अपूर्णांक व्यस्त संख्या : अपूर्णांकाचा अंश व छेद यांची आदलाबदल करून येणारा अपूर्णांक हा मूळ अपूर्णांकाचा व्यस्त अपूर्णांक किंवा अपूर्णांक व्यस्त संख्या असते. उदा. 5/7 चा 7/5 हा अपूर्णांक व्यस्त अपूर्णांक आहे.

21) त्रिकोणी संख्या : दोन क्रमागत संख्यांच्या गुणाकाराच्या नम्नपटीस त्रिकोणी संख्या म्हणतात. म्हणजेच पहिली क्रमागत संख्या = x मानू. लगतची क्रमागत संख्या = (x+1) होईल.
: त्रिकोणी संख्या = x x (x+1)/2
उदा. पहिली क्रमागत संख्या (x) = 4 घेऊ
दुसरी क्रमागत संख्या (x+1) = (4+1) = 5
त्यांच्या गुणाकाराची निम्मपट = (x गुणीले (x+1)/2 = 4x5/2 =20/2 = 2x10/2=10
: 10 ही त्रिकोणी संख्या आहे.
लक्षात ठेवा 1) शून्याला अपूर्णांक व्यस्त संख्या होईल. नसते. 2) ज्या अपूर्णांकात अंश व छेद यांना कोणत्याच संख्येने भाग जात नाही, तो अपूर्णांक आणि त्याचा व्यस्त अपूर्णांक एकमेकांचे गुणकार व्यस्त असतात.

ब) गणिताची मूलभूत संकल्पना प्रश्नसंच : 1) 2/13 चा अपूर्णांक व्यस्त अपूणार्क कोणता? 2) 8/20 चा अपूर्णांक व्यस्त अपूर्णांक कोणता? 3) -15/1 चा अपूर्णांक व्यस्त अपूर्णांक कोणता? 4) 6 ही कोणत्या दोन संख्यांमुळे तयार होणारी त्रीकोणी संख्या आहे?

क) उखाणा 1) वाघ शब्दाला शार्दुल हा समानार्थी शब्द वापरतात, अपूर्णांकाचा अंश व छेद यांची आदलाबदल करून येणाऱ्या अपूर्णांकाला मूळ अपूर्णांकाचा व्यस्त अपूर्णांक म्हणतात. 2) लक्ष्मी शब्दाचा समानार्थी शब्द आटे वैष्णवी, दोन क्रमागत संख्यांच्या गुणकाराच्या निम्मपटीस म्हणतात संख्या त्रीकोणी.

ड) कविता : १३ क्रमांक.


१३) सांगा पाहू...
गोटीला काठी एकाचा
वाटीला काठी दोनाचा
वाटीला वाटी तीनाचा
गायीचे शिंगे चाराचा
हाताची बोटे पाचाचा

तुकारामनीती
भाग 26

# सोनें रूपें आम्हां मृत्तिके समान । माणिकें पाषाण खडे जैसे ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आजकाल आपला म्हणजेच मानवाचा कृतीपरान्मुखता हा दोष सातत्याने समोर येत आहे. याच अनुषंगाने 'तुकाराम नीती' हे सदर लिहिण्यासाठी तुकोबांच्या गाथ्यातील अभंगांचे सूक्ष्म वाचन-चिंतन-मनन आणि तुकोबांचे जीवनचरित्र याचे सिंहावलोकन केले असता विविध प्रश्नांची सोडवणूक होतांना जाणवत आहे. त्याचबरोबर तुकाराम नीती हे सदर अनेक विद्वजन वाचून त्याविषयी मला प्रत्यक्ष किंवा मिडीयावर आपल्या प्रतिक्रिया देतांना नवनवीन गोष्टींची सूचना करतात आणि तुकोबांच्या अभंगांवर लेखन करणे किती आव्हानात्मक आहे (?) याची थोडी थोडी प्रचीती येत आहे. सोनपेठ येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयातील मराठीचे प्रो.डॉ.बालासाहेब काळे यांनी मागील लेखाविषयी बोलतांना, "तुम्ही तुकाराम क्लिष्ट करून न सांगता सहज करून सांगावा. तसेच तुकोबांना कोणताही दैवी पुरुष किंवा त्यांनी कोणतेही चमत्कार केले नाहीत याचे प्रतिपादन करावे" असे सल्लावजा मार्गदर्शन केले. त्याचबरोबर 'साहित्याक्षर' या कवी-लेखकांच्या व्हॉट्सअ‍ॅप समूहावर एक जेष्ठ वाचक श्री नाना ढवळे लिहितात, "मनुष्याजवळ सर्व सुखसाधने असूनही तो पळत्यापाठी धावत आहे. हे जर असेच चालू राहिले तर दवाखाने नाही; तर वेड्यांची इस्पितळेच उघडावी लागतील. म्हणून अत्त दीपो भव (तूच तुझा दिवा हो !) यासारख्या सुभाषितांनी लेखाला एक वेगळीच भावनिक खुमारी आली आहे !" या दोन्हीही प्रतिक्रियांवर चिंतन केले असता यांच्या सुचना अत्यंत मौलिक असून त्यामुळे पुढे आणखी वेगळा विचार करून लिहायला बळ मिळाले.**

या दोन चिंतकांनी आणखी वेगळ्या प्रकारे चिंतन मांडण्यासाठी मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करतो. हा सगळा विचारांचा खटाटोप चालू असतांना, तुकोबांच्या गाथ्यातील पुढील

मृत्युलोकीं आम्हां आवडती परी । नाहीं एका हरीनामें विण ॥१॥
विटलें हें चित्त प्रपंचापासूनि । वमन तें मनीं बैसलेंसे ॥धृ.॥
सोनें रूपें आम्हां मृत्तिके समान । माणिकें पाषाण खडे जैसे ॥२॥
तुका म्हणे तैशा दिसतील नारी । रिसाचियापरी आम्हांपुढें ॥३॥
(शा.अ.गाथा अ.क्र.५२२)

हा अभंग समोर आला. हा अभंग वाचल्यानंतर, खरंच तुकोबा जीवन आणि जगण्याचे किती सहज आणि मुलभूत चिंतन करून अभंग निर्माते झाले (?) याचे आश्चर्य वाटते ! एक सामान्य माणूसच संतत्वाला पोहोचतो याचे अलौकिक उदाहरण म्हणजे सतराव्या शतकातील तुकोबाराय ! श्रीमद् भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायातील अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ॥

या संतांची लक्षणे व्यक्त करणाऱ्या श्लोकामध्ये अत्यंत महत्वाचे गुण आपल्यासमोर मांडतांना संत ज्ञानेश्वर माउली

जो सर्व भुतांच्या ठाई । द्वेशाते नेणेची काही । आप परू नाही । चैतन्या जैसा ॥

ह्या ओव्या संतांची लक्षणे सांगत असतांना आपल्या मधील संचरलेले चैतन्य हेच सर्वत्र सृष्टीत प्रविष्टीत झाले असून इथला प्रत्येक प्राणीमात्र हा या चैतन्याचाच अविभाज्य भाग बनला आहे ! तो आणि सज्जन किंवा संत यांना वेगळे करणे म्हणजे श्वास आणि शरीर वेगळे करण्यासारखे होईल ! याच न्यायाने सामान्य माणसात वावरणारे तुकोबा अनेक अनुभव आणि जीवनातील चढ उतार पचवून संतत्वाकडे मार्गक्रमण करतांना आपल्यात एक अलौकिक विश्व तत्वाचा समावेश जाणवून घेतात. त्यामुळेच तुकोबाराय दैनंदीन जीवन जगतांना या मृत्युलोकातील सामान्य माणसांच्या व्यवहाराला बाजूला ठेवून फक्त आणि केवळ ईश्वरी आनंदतत्व सोबत घेऊन जगत असतात. परिणामी त्यांची अवस्था म्हणजे प्रपंच हा क्षणिक असून त्यापासून त्याचे मन पूर्णतः अलिप्त झाले असून हा संसार म्हणजे वमन म्हणजेच 'उलटी/वांती' सारखा आहे याची त्यांना अनंतवेळा प्रचीती येऊन जाते. शिवाय सांसारिक व्यवहार, पैसा-अडका-संपत्ती या बाबतीत तुकोबांना माती आणि त्यात काहीच फरक वाटत नाही. तसेच हिरे, माणिक, मोती हे केवळ दगडाच्या खड्यासारखे आहेत ! त्याचबरोबर या सर्व अभंगाचा कळस म्हणजे तुकोबांना स्त्रिया सुद्धा केवळ 'उलटी' सारख्या वाटत असून त्यांच्या ठाई आता कोणताही भेद उरलेला नाही.

त्याचबरोबर या अभंगाचा विविध ग्रंथ आणि मिडीयावर संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भेटीचा संदर्भ दिला गेला आहे. कदाचित ते खरेही असेल ! त्याचे कारण म्हणजे संत तुकारामांची अवस्था अत्यंत आव्हानात्मक झाली होती. दुष्काळ, पत्नीचे मरण आणि लोकांकडून येणारे कर्ज तुकोबांनी पाण्यात बुडवून टाकल्यामुळे त्यांचे दिवाळे निघाले होते. छत्रपती शिवराय तुकोबांच्या कीर्तनाला येऊन बसत किंवा प्रसंगी त्यांच्यासोबत हितगुज करत असावेत, कारण हे दोन्ही महापुरुष पुणे परिक्षेत्रात रहात होते. मासाहेब जिजाऊ ह्या धार्मिक वृत्तीच्या असल्याकारणाने त्यांनी छत्रपती शिवाजी राजांना तुकारामांच्या दर्शनाला पाठवले असावे. तुकाराम महाराजांच्या संसाराची झालेली दयनीय अवस्था राजांना कळल्यामुळे, त्यांनी तुकोबांना नजराण्यात काही रक्कम, सोने-नाणे आणि जड-जवाहीर पाठवले. शिवाजी महाराजांचे सेवक जेंव्हा हा नजराणा घेऊन तुकोबांच्या घरी गेले, तेंव्हा तुकोबा भजनाला गेले होते. भजन करून परतल्यानंतर तुकोबांनी आपल्या लेकरांच्या अंगावर उंची वस्त्रे, पत्नीच्या अंगावर भरजरी पातळ आणि सोन्याचे दागिने पहिले, घरात अन्न शिजल्याचा घमघमाट आला. तेंव्हा तुकोबांना याचा धक्काच बसला ! त्यांना सर्व वृतांत माहिती झाल्याबरोबर त्यांनी संपूर्ण नजराणा, लेकरांच्या अंगावरील उंची वस्त्रे, पत्नीच्या अंगावरील उंची पातळ आणि सर्व दागदागिने तात्काळ छत्रपती शिवाजी महाराजांना परत केले. ही बातमी छत्रपती शिवाजी महाराजांना कळताच ते तुकोबांच्या भेटीला गेले. तेंव्हा, तुकोबाराय घरी भजन करत होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी तुकाराम महाराजांचे दर्शन घेऊन 'नजराणा का परत केला ?' असा विनम्रपणे प्रश्न केला, तेंव्हा तूकोबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अगदी सहजतेने या अभंगाद्वारे उत्तर दिले. असाही या अभंगाचा संदर्भ दिला जातो.



आजकाल भोवताल कीर्तनकार-प्रवचनकारांचे अक्षरशः पेव फुटले आहे ! कीर्तन-प्रवचन-भजन या सर्वांग सुंदर आनंदायी कलांना व्यवसाय म्हणून पाहिले जात आहे ! ही फार मोठी शोकांतीका आहे ! महाराज लोकच एकमेकांच्या कीर्तनाच्या सुपाऱ्या घेत आहेत ! 'तू माझा कार्यक्रम आयोजित कर, मी तुझा करतो' अशी दलाली करणाऱ्या खोटारड्या-भोंदू-पोपट लोकांचा वारकरी सांप्रदायात सुळसुळाट झाल्यामुळे निका-नितळ वारकरी सांप्रदाय कलंकित होत आहे ! जातभेद-लिंगभेद रहित सामाजिक समतेचा मंत्र घेऊन जन्मलेला वारकरी सांप्रदाय दिवसेंदिवस जाती केंद्रित होत आहे ! कीर्तन-भजनातही घाणेरड्या राजकारणाचा प्रवेश झाला आहे ! हे सगळे प्रकार ऐकल्यानंतर मन व्यथित होते. या गोष्टींची किळस यायला लागते ! परंतु अजूनही वेळ गेली नाही ! तेंव्हा, कमीत कमी वारकरी सांप्रदायातील लोकांनी या घाणेरड्या गोष्टींचा त्याग करून, बाजारूपणाला मुरड घालून, आपल्या कीर्तनाचे भाव कमी करून, आपला 'शुद्ध भाव' ईश्वर चरणी अर्पण करावा ! मी 'घरावर तुळसीपत्र ठेवून फुकट कीर्तन करा' असेही म्हणणार नाही, मात्र 'भिक्षापात्र अवलंबिणे। धिक जिणे लाजिरवाणे' या तुकोबांच्या ओळींचा अंगीकार करून कोणताही सौदा न करता योग्य तेवढीच 'बिदागी' घ्यावी ! असे झाल्यास, जनता-जनार्दन लोक कीर्तन-प्रवचनकार मंडळीकडे पुन्हा सन्मानाने पहायला लागतील !

तेंव्हा, हे सगळे संदर्भ, तुकोबांचा जीवन संघर्ष आणि त्यांच्या अभंग रचना याचे सरळ सरळ अवलोकन केले असता, माणसाची 'आनंदाचे डोही आनंद तरंग' ही अवस्था केंव्हा होईल ? याचे सुंदर उदाहरण म्हणजे तुकोबांचा हा अभंग होय. कोणतेही लेखन हे त्या त्या काळाचे जरी अपत्ये असले, तरी ते लेखन त्रिकालाबाधित असते हे विसरून चालणार नाही. बदल हा काळाचा नियम असला तरी, मानवी जीवनात अनेक स्थित्यंतरं, आव्हाने, सुख-दुःख, चढ-उतार सातत्याने येत असतात, मग तो माणूस गरीब असो की श्रीमंत ! त्यामुळेच कोणतेही वाङमयहे स्थल-कालातीत असून, ते सातत्याने लोकजागृती करत असते. असे नित्य जागृतीचे कार्य करणारे वाङमयच चिरंतन काम करत असते. हे सगळे गुणधर्म संत तुकोबांच्या अभंगांमध्ये असल्याकारणाने त्यांचे अभंग सार्वकालिक परिणामकारकता दर्शवतात. याशिवाय, दैनंदिन संसारिक माणसांनी या अभंगाचा सहज अंगीकार करून संपत्तीला अनावश्यक महत्व न देता, दैनंदिन जीवन आनंदात व्यतीत केल्यास, तसेच जगतांना तुलना न करता जगल्यास आणि विशेषतः आपल्या पत्नीशिवाय इतर स्त्रियांना माता-भगिनींचा दर्जा देऊन आपला संसार केल्यास कुणीच दुःखी होणार नाही ! कुठेच वाद-विवाद अथवा वितंडवाद निर्माण होणार नाहीत ! कुणी कुणाच्या संपत्तीचे हरण करणार नाही ! शेती-सत्ता-संपत्ती यावरून होणारे वाद कायमचे संपुष्टात येतील ! परिणामी, उच्च रक्तचाप-सुगर सारख्या ताणताणावातून निर्माण होणाऱ्या दुर्धर आजारांवर कायमचा विजय मिळवता येईल ! सगळी माणसं आनंदी, निरोगी, मस्त हसत-खेळत जीवन जगतील ! असे झाल्यास आपण "सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे संतु निरामय" या अवस्थेला जाऊन पोहचू ! तेंव्हाच तुकोबांच्या अभंगांचे आणि आमच्यासारख्या मालवाहू हमालांच्या लेखणीचे सार्थक होईल ! तुकाराम नीतीचे फलित होईल !

जय तुकोबाराय !

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# मेहनतीचे फळ...



बबलू कराळे
संपर्क क्र.: 7218029838



आज मन थोडं सैरभैर झाले होते. सतत डोक्यात आठवणीने कल्लोळ उठवीला होता... आठवणींचा पारवा सतत तिलस्मि आसमंतात आपल्या ओ ढीचीच्या लहरी उधळन करीत होता. लहान असताना मला नेहमीच एक प्रश्न पडायचा. माझी आई एव्हडी घरातली काम करून दुसऱयाच्या शेतात दिवसभर काम करते तरी सुद्धा आपली परिस्थिती जशी आहे तशीच आहे. मी आईला म्हणायचो "आई मला आज शाळेत जाताना डब्यात काही गोड करून देजो. " त्यावर आई हसून उत्तर दयायची... हो एक दिवस नक्कीच करून देईल? " मग मी उदास व्हायचो, मी माझ्या वर्गात असलेल्या मुलांच्या डब्यात असलेले वेगवेगळे जेवायचे पदार्थ पाहून मनातच खजिल व्होयचो, अन आपल्या डब्यात पाहाचो, तेव्हा मला माझ्या मनाला खूप प्रश्न विचारावे असे वाटायचे. मग मी पुन्हा आईला म्हणायचो आई असे का? तेव्हा आई म्हणायची "बाळा आपण गरीब आहोत? " आईचे ते उत्तर काळजात घर करून गेले. आणि यावर कसा विजय मिळवायचा यावर प्रयत्न सुरु केले. मग सुरु केली पुस्तकांशी मैत्री... मी माझी श्रीमंती पुस्तकात शोधू लागलो. त्यानी ही माझ्याशी खूप मस्त मैत्री केली. मग वर्गात शिक्षक मला शाब्बासकी दयायचे. खूप बर वाटायचं. मला आता आपल्या दरिद्री जीवनना बदल करायचा होता.

मी जेव्हा अभ्यास करायचो तेव्हा मला वेळेचे भान राहायचे नाही. तेव्हा वडील म्हणायचे. "मोठा अभ्यास करणारा गेला, आता हा मास्तरच होणार? " वडिलांचे ते उपरोधीत बोलणे मनाला टोचत होते. मी आईला मानायचं आई बाबा असे का बोलतात मला नेहमी-नेहमी तेव्हा आई म्हणायची तु त्याच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नको. दिवसभर काम करून चिडचिड करतात. तो दिवस आजही आठवला की माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहतात. मी नेहमी प्रमाणे अभ्यास करत होतो. तेव्हा बाबा आले. आणि त्याचे तेच बोलणे. मोठा मास्तर...? मला त्या वेळेस खुप वाईट वाटले आणि मी पण बाबांना म्हणालो "हो मी होऊनच दाखवेल शिक्षक." तेव्हा बाबा माझ्याशी काहीच बोलले नाही, आणि माझ्या डोक्यवर प्रेमाने हात फिरवून निघून गेले. तेव्हा मलाच प्रश्न पडला बाबा आपल्यावर सतत रागावणारे आज असे प्रेमळ कसे झाले. त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले.

पुढे बारावीत मी जेव्हा शाळेतून आणि तालुक्यात प्रथम आलो तेव्हा माझ्या वडिलांनी आमच्या मोहल्लात पेढे वाटले.

आईने मला पेढा भरवला अन आई म्हणाली कसा वाटला तुझ्या मेहनतीचा पेढा? गोड ना. पुढे मी डी. एड केले आणि शिक्षक झालो. तेव्हा आई बाबाचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

# अन् भर पावसाळ्यात निवृत्त पोलिस अधीक्षकांचे झाड आंब्यानी बहरले. !!

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सिडको एन-४ मधिल निवृत्त पोलिस अधिक्षक हिरासींग जाधव यांच्या निवासस्थानी असले झाड आंब्यांनी लगडलेले आहे. सितामाई या त्यांच्या निवासस्थानी बारा वर्षांपूर्वी त्यांच्या पत्नी इंदूताई यांनी या आंब्याच्या झाडाची लागवड केली होती. नियमितपणे खते ..फवारणी.. चांगली काळजी घेऊन आंब्याचे झाड बंगल्यात वाढविलेले आहे. वर्षामधून दोनदा हे झाड आंब्यानी बहरुन येते.असे इंदुताईनी सांगितले. उन्हाळ्यात दोन हजाराहून अधिकच आंबे येतात तर दसरा दिवाळीला या झाडाला दिड हजारांहून अधिक आंबे येतात.
आम्ही आमच्या नातेवाईकांना बोलवून दिवाळीत साऱ्यांनाच आंब्याचा रस..कांदाभजी.. कुरवड्या पापड्या.. भरल्या वांग्याची भाजी... अशा लज्जतदार मेजवानीचे आयोजन बऱ्याचदा करतो असेही इंदूताईंनी मोठ्या उत्साहात आम्हाला सांगितले.
आंब्याच्या झाडाचे खास कलम करुन आम्ही आणलेले आहे.आंब्याचा आकार टेनीस चेंडूसारखा आहे. फळ चांगलेच मोठ्या आकाराचे आहे. आंबा पिकल्यावर गडद केसरी घट्ट रस मिळतो. अतिशय चवदार स्वादिष्ट असा भरपूर रस या आंब्यापासून मिळतो. आंब्याची कोय छोटी असुन आंब्यात भरपूर गर असतो असंही त्यांनी पुढे सांगितले...
अशा आगळ्या वेगळ्या बहरलेल्या आंब्याच्या झाडाची फळं पाहण्यासाठी एन -४ सिडकोतील उच्चभ्रू मंडळी आवर्जून येतात हे बाकी खरं...








# ज्ञानेश्वर विद्यालयात ७४वा मराठवाडा मुक्तीसंग्रामदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. नारायन लवांडे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पाथ्रीकर मॅडम, विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संतोष अधाने सर, श्री एम.ए. सलीम सर हे उपस्थित होते. मराठवाडा मुक्ती संग्रामदिना संदर्भामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. यामधून कु. गायत्री चव्हाण हिने प्रथम क्रमांक मिळवला तर, कु. ऋतुजा ढेपले या विद्यार्थीनीने द्वितीय आणि कु. रोशनी हंगारगे या विद्यार्थीनी तृतिय क्रमांक मिळवला.
सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मु. अ. नारायण लवांडे सर, पर्यवेक्षक संतोष अधाने, एम. ए. सलीम यांनी पारितोषिक देऊन गौरव केला. एन.सी. सी.च्या विद्यार्थ्यांनी पथसंचलन केले. मराठवाडा मुक्तीसंग्राम संघर्षासाठी ज्यांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले अशा थोर स्वातंत्र्य सेनानी यांना कशा प्रकारे मानवंदना दिली जाते याचा सजीव देखावा सादर केला. यासाठी विनय बढे सर यांचे मार्गदर्शन लाभले.
मराठवाड्याची श्रीमंती आणि मराठवाड्याचे महाराष्ट्रासाठी योगदान या विषयावर श्री.सुनील भडके सर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले, तर भरत झोडपे सर यांनी मराठवाड्याचा क्रांतिकारी इतिहास विद्यार्थ्यांना सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम. सोनाली राठोड मडम यांनी केले. आभार अच्युत औटे सर यांनी मानले. मुख्याध्यापक श्री.नारायण लवांडे सर यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# प्रा. पांडुरंग आठवले यांच्या कार अपघाताची चौकशी करून दोषींना शिक्षा द्या

## डॉ. मिलिंद आठवले यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन दीड वर्ष होऊन तपास नाही

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरणप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले असता डॉ. मिलिंद आठवले यांनी निवेदन दिले. प्रकरणाची माहिती घेऊन कार्यवाही करण्यासाठी लवकरच आदेश देण्यात येतील असे आश्वासन यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

निवेदनात म्हटले आहे की, यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुका येथील नेहरू महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक असलेले पांडुरंग आठवले यांचा यवतमाळ ते नेर मार्गावर फुटका माथा कोलुरा गावाजवळ 20 मार्च 2021 रोजी कार ट्रकचा अपघात होऊन जागेवरच मृत्यू झाला होता. दीड वर्ष होऊन गेले मात्र अजूनही अपघात घडवून गेलेल्या वाहनाचा पोलिसांनी तपास पूर्ण केला नाही, या वाहनाचा तात्काळ तपास करून चौकशी करण्यात यावी व प्रा. आठवले यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देऊन, दोषींना कठोर शिक्षा करावी,प्रा.पांडुरंग आठवले हे 19 मार्च च्या मध्यरात्री यवतमाळ वरून (कार क्रं. एम एच 29 बी पी 2921) नेर कडे येत असतांना रात्री 12 ते 2 वाजे दरम्यान हा अपघात घडल्याचे सांगितले जाते. अपघातस्थळी INDIA IS GREAT अशी पेंटिंग असलेल्या ट्रकचा लोखंडी रॉड अपघातग्रस्त



कारच्या बाजूला पडलेला होता, पोलिसांनी तो रॉड जप्त केला आहे,नेर पोलीस स्टेशन समोरून जात असलेल्या अशा प्रकारच्या ट्रकचा किंवा अशा वाहनाचा 10 ते 4 वाजे दरम्यानच्या वेळेचा अंदाज घेता येतो,त्यावरून वाहनाचा तपास व शोध घेता येऊ शकतो,अशा प्रकारचा रॉड तुटलेले कोणते वाहन पुढच्या कोणत्या मार्गावर गेले का? तेथील टोल नाक्याची सुद्धा पाहणी करून वाहन पाहता येऊ शकते किंवा इतर पर्याय उपयोगात आणता येऊ शकतात,सीसीटीव्हीत आलेला फोटो पाहून वाहन, वाहनाचा क्रमांक व इतर माहिती घेता येऊ शकते. प्रा. पांडुरंग आठवले हे सामाजिक क्षेत्रात कार्यरत होते, प्रा. आठवले हे विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून होते, प्रा.आठवले यांचे सामाजिक कार्यात मोठे योगदान होते, निवेदनात मागण्या केल्या आहेत की,अपघात घडवून गेलेल्या वाहनाचा तात्काळ शोध घ्यावा. दोषींना कठोर शिक्षा व्हावी,दिवंगत प्रा. पांडुरंग आठवले यांच्या कुटुंबातील पात्र सदस्य डॉ. मिलिंद आठवले यांना अनुकंपा योजनेत शासकीय सेवेत तात्काळ नोकरी द्यावी,दिवंगत प्रा. पांडुरंग आठवले यांच्या वयोवृद्ध आई वडीलांना तात्काळ पेन्शन सुरू करण्यात यावी व दिवंगत प्रा. आठवले यांच्या कुटूंबाला आर्थिक मदत द्यावी अशा मागण्या निवेदनात केल्या आहेत.

निवेदनावर डॉ.मिलिंद आठवले व सुदाम सोनवणे यांच्या सह्या आहेत.



# आ. फारुक शाह यांचा कामाचा धडाका...! नवीन रस्त्याचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील शिवाजीनगर नंदी रोड मामा कलेक्शन जवळ अनेक वर्षांपासून पावसाळ्यात पावसाचे पाणी तुंबत होते आणि हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. तेथे नविन काँक्रीट रस्ता व्हावा अशी परीसरातील रहिवाशी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर मागणी होती. याठिकाणी रस्ता नसल्याने आणि पाणी जमत असल्याने रस्त्याची खूपच दुर्दशा झालेली होती. येणा-जाणाऱ्या नागरिकांना त्या रस्त्यावरून जातांना लहान मोठे खड्डे व जमेलेले पाणी यातून वाहने घेऊन जाणे, या सारख्या अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. या ठिकाणी मागील काही आठवड्यांपूर्वी आमदार फारूक शाह यांना तेथील नागरिकांनी मागणी निवेदन दिले होते. यावरून आमदार फारूक शाह यांनी सदर भागांची पाहणी करत लवकरात लवकर रस्त्याचे काम करणार असा शब्द आमदार फारूक शाह यांनी दिला होता. त्याच अनुषंगाने मुलभूत सुख-सुविधा २०२१-२२ योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ शिवाजीनगर नंदी रोड येथे काँक्रीट रस्ता करणे असे १५ लाखांच्या कामाचा धुळे शहराचे आमदार फारूक शाह यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

# वडील गेले.. चार मुलींच्या मदतीला देवासारखे धावून गेले आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत!

**चारही मुली माझ्या भाच्या असून त्यांची मी जबाबदारी घेतो असे सांगत मयताच्या कुटुंबाला दिला धीर...**

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शेततळ्यात बुडून मृत्यू झालेल्या बळीराजाच्या चार मुलींचे काय होणार या चिंतेत असलेल्या कुटुंबाच्या आणि त्या मुलींच्या मदतीला संवेदनशील डॉ. तानाजीराव सावंत देवासारखे धावून गेले. त्या मुलींचे संपूर्ण पालकत्व घेण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केल्याने मुलींच्या मातेला अश्रू अनावर झाले.

उस्मानाबाद तालुक्यातील सारोळा येथील शेतकरी नागेश सुरवसे यांचा काम करीत असताना पाय घसरून शेततळ्यात बुडून मृत्यू झाला होता . या त्यानंतर या कुटुंबावर मोठे संकट कोसळले होते. कुटुंबात ४ मुली असल्याने त्यांचे शिक्षण लग्न व भविष्याची चिंता या मुलींच्या आईला होती. अशा संकटात आरोग्यमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी या कुटुंबाचे पालकत्व घेत जबाबदारी स्वीकारली. यापुढे या चार मुली माझ्या भाच्या असून त्यांची मी जबाबदारी घेतो असे सांगत मनीषाताई आता यापुढे काळजी करू नका असे सांगत या कुंटुंबाला धीर दिला. सुरवसे कुटुंबीय हे उस्मानाबादमध्ये रामनगर येथे राहत होते त्यांची व्यथा सनी पवार या सामाजिक कार्यकर्त्यांनी मंत्री सावंत यांच्याकडे मांडली . त्यावेळी सावंत यांनी जबाबदारी घेतली. याप्रसंगी धनंजय सावंत, केशव सावंत, डॉ. तानाजी सावंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामचंद्र घोगरे, दत्ता साळुंके , जिल्हाध्यक्ष सुरज साळुंके, अविनाश खापे , अजित लाकाळ यासह पदाधिकारी उपस्थित होते. आरोग्यमंत्री डॉ . तानाजीराव सावंत यांनी यापूर्वी शिवसेनेचे माजी तालुका प्रमुख कै. दिलीप जावळे कुटुंबाचे पालकत्व स्वीकारत १० लाखांची मदत केली होती तसेच दोन्ही मुलांच्या शिक्षण व नोकरीची जबाबदारी घेतली होती .





# उभंड येथे वनविभागाचा तलाव फुटून १५ लाखांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** तालुक्यातील उभंड नद्रि या गावात एका फॉरेस्ट विभागाचा तलाव फुटून यशवंत बागुल या शेतकऱ्याच्या शेतात अचानक पाणी आल्याने डाळिंब पिकाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. या संदर्भात यशवंत बागुल यांनी पत्रकार परिषद घेतली. यशवंत सुरेश बागुल २ शेत असून १२ एकर शेतात गेल्या दोन वर्षापासून २५ लाख रुपये खर्च करून डाळींब पिकांचे झाडे लावलेली होती शेताला लागून बनविभागाचा ( फॉरेस्ट ) चा तलाव आहे. परंतु तो तलाव कच्चा व मातीचा असून त्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठवले जाते. वारंवार बनविभाग ( फॉरेस्ट ) ऑफिसचे आर.एफ.ओ. महेश पाटील यांना तक्रार करून देखील त्यांनी कुठलीच दखल घेतलेली नाही दोन ते तीन दिसापुर्वी मुसळधार पावसात सदर तलाव फुटल्याने संपूर्ण पाणी शेतात आले व माझे १५ लाखाच्या डाळींबाचे नुकसान झाले असून संदर नुकसान वनविभाग (फॉरेस्ट) कार्यालयाच्या हलगर्जीमुळे झाले आहे. सदर नुकसान हे मोठे असून आता त्या डाळींबाला फळे लागली असती व त्याच्यातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळाले असते अशे पत्रकार परिषदेत म्हटले मी कर्ज काढून शेतात पैसा लावला या नुकसानामळे मी हवालदील झालो असून मला आत्महत्या केल्याशिवाय पर्याय नाही असे बागुल यांनी म्हटले वनविभागामार्फत माझ्या शेताचा पंचनामा करण्यात यावा व झालेल्या नुकसानीची चौकशी करून मला भरपाई, मोबदला मिळावा. अन्यथा मला माझ्या जीवाचे बरे वाइंट करावे लागेल. त्यास जबाबदार धुळे वनविभागाचे फॉरेस्ट अधिकारी व प्रशासन हेच राहतील व माझा सम्पूर्ण परिवार विष प्राशन करून आत्म दहन करतील असे नुकसानग्रस्त शेतकरी यशवंत बागुल यांनी म्हटले.



## मराठा समाजाबद्दल अश्लील भाष्य ; निरीक्षकास कायमस्वरूपी बडतर्फ करावे

आधुनिक केसरी न्यूज

कन्नड : मराठा समाजाबद्दल अश्लील भाष्य करणाऱ्या जळगाव येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण बकाले यांना शासकीय सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करावे असे निवेदन कन्नड पोलीस ठाण्याचे साहयक पोलीस निरीक्षक दिनेश जाधव व महसूल प्रशासनाचे हारून शेख यांना सकल मराठा समाज कन्नड तालुका यांच्यातर्फे देण्यात आले.

जळगांव येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार बकाले यांनी मराठा समाजा बदल अतिशय घानेरडे व अश्लिल भाष्य केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील नव्हे तर संपुर्ण देशातील मराठा बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. तसेच त्यांच्या सदरील निच वक्तव्यामुळे समाजा समाजात तेढ निर्माण होईल असे वर्तन करण्यास त्यांनी समाजास भाग पाडले आहे. त्यांनी मराठा समाजा बदल निच भाषेत बोललेले ऑडीओ क्लीप सोशल मिडीयाव्दारे सर्वत्र व्हायरल झालेली आहे ज्यामुळे संपुर्ण मराठा बांधवाचा अपमान झालेला आहे. सदरील प्रकरणाची सखोल चौकशी करुन त्याच्यावर तात्काळ भा.द.वी. कलम 153 अ,500, 503,504 व 505 अन्वय फौजदारी गुन्हा दाखल करुन कडक शासन करावे. शासकीय सेवेतुन कायमस्वरुपी बडतर्फ करण्यात यावे ही विनंती करण्यात आली जेणेकरुन न्यायव्यवस्था अबाधीत राहील नसता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील याची नोद घ्यावी. असे निवेदन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई व जिल्हाधिकारी औरंगाबाद तसेच पोलीस अधिक्षक औरंगाबाद , पोलीस निरीक्षक कन्नड , तहसीलदार कन्नड यांना ही माहितीस्तव देण्यात आले आहे या वेळी सुनिल पवार , सुरेश चव्हाण , विजय भोसले , शेखर शिंदे , गोरख पाटील , अमृत बिरारीस , संजय शिंदे, सुमित सोमवंशी, विष्णु मनगटे,लक्ष्मण अल्हाड, प्रविण दाभाडे, साईनाथ अल्हाड, बाळु अल्हाड इत्यादी मराठा बांधवाच्या स्वाक्षरी आहेत.

## मजुरांची मजुरी व कारखान्यासाठी जमा केलेले भांडवल परत करावे : ॲड. पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** येथील नियोजित श्री हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना उभारणीसाठी सन 1994 पासून सन 2003 पर्यंत वेगवेगळ्या संचालक मंडळामार्फत सदर कारखाना उभारणीसाठी या परिसरातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर भाग भांडवल जमा करण्यात आले होते.

या तून सुमारे ८२ एकर शेत जमीन विकत घेण्यात आली होती, व या जागेवर एक गोडाऊन, इमारत आणि हौद इत्यादीचे बांधकाम करण्यात आले आहे तेही आज तुटक्या फुटक्या अवस्थेत आहे, परंतु 2003 नंतर या कारखान्यावर निवडून आलेल्या संचालक मंडळाच्या वतीने बराच कालावधी उलटून गेला तरी सदर कारखाना उभारणीबाबत कोणतीही प्रगती न दिसून आल्याने हा कारखाना उभारण्यापूर्वीच या कारखान्याचे लायसन्स /परवाना हा रद्द करण्यात आला, व त्यानंतर सदरचा कारखाना शासनाचे वतीने दिनांक 11/02/.2022 रोजी विक्री निवेदा काढून दिनांक :28. 02.2022 रोजी रक्कम रुपये 4 कोटी 35 लाखात विक्री करण्यात आला. त्यामुळे शासनाकडे भागधारक शेतकऱ्यांचे भाग भांडवला पोटी जमा केलेली रक्कम :रुपये .02 कोटी 08 लाख व कर्मचारी थकीत पगारापोटी रक्कम रुपये :07 लाख जमा असून ते सदर भागधारक शेतकऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना परत करणे नितांत गरजेचे आहे ,सदरचे भाग भांडवल भागधारक शेतकऱ्यांना दिनांक 30 सप्टेंबर 2022 पूर्वी परत करण्यात यावेत ,,..नसता या परिसरातील संपूर्ण शेतकरी व कर्मचारी 02 ऑक्टोंबर 2022 पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित साधून तहसील कार्यालय, कन्नड.. समोर धरणे आंदोलन व उपोषण करतील असे निवेदनात नमूद केले आहे

याबाबतचे निवेदन तहसीलदार, कन्नड यांना दिनांकः 16 .09. 2022 रोजी ॲड. कृष्णा पाटील जाधव ,माजी व्हा. चेअरमन श्री. हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या. पिशोर व अन्य शेतकरी यांचे वतीने देण्यात आले. आहे तसेच सदर निवेदनाच्या प्रती मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद ,मा. प्रादेशिक सह संचालक (साखर) औरंगाबाद मा. शासकीय अभि हस्तां किती, श्री हिराजी महाराज साखर कारखाना (नोंदणी रद्द), पिशोर, इत्यादींना पाठविण्यात आल्या.



गोर गरीब कर्मचारियांची राहिलेली पगार व उभारनी साठी केलेला भांडवल परत द्यावे या करिता कन्नड तहसील कार्यलयात रितसर अर्ज केला आहे 2 ऑक्टोम्बर पर्यन्त योग्य निर्णय नाही घेतल्यास लोकशाहीच्या मार्गाने उपोषणास सुरुवात करण्यात येईल,
**-ॲड. कृष्णा पाटील जाधव**, मा .व्हा. चेअरमन, श्री हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना, मर्या. पिशोर



## देव्हारी येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा !

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** ग्रामपंचायत कार्यालय देव्हारी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय सरपंच शामिरखा तडवी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रीय छात्रसेनेच्या वतीने शानदार संचलन करण्यात आले. उपस्थित असलेले ग्रामपंचायत कार्यालय देव्हारीचे ग्रामसेवक काळे, उप सरपंच मिरा बाई चव्हाण, तेजराव जाधव , पंडित राठोड, रोहिदास राठोड, मोहन चव्हाण, पत्रकार बहादूर चव्हाण, ग्रामपंचायत शिपाई निलेश चव्हाण, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम महारू चव्हाण,शरद राजपुत, नितीन मोरे , सुदाम जाधव, , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

# लंपी चर्म रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी सतर्क रहावे

## तहसीलदार जसवंत : तलाठी, कोतवाल, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, पो. पाटील यांची संनियंत्रण समितीची बैठक घेऊन सतर्क राहण्याचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** महाराष्ट्रात जळगाव, पुणे,बुलढाणा व औरंगाबाद या जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात सध्या पाळीव पशुंमध्ये लंपी स्किन या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे निष्पन्न झालेले आहे.जनावरे दगावत आहेत. केंद्र शासनाने प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार अधिसूचित केलेल्या रोगांमध्ये 'लंपी स्किन' या रोगाचा 'अनुसूचित रोग' म्हणून समावेश केलेला आहे. याबाबत शेतकऱ्यांनी सतर्क रहावे, असे आवाहन तहसीलदार रमेश जसवंत यांनी केले आहे. 'लंपी स्किन रोग नियंत्रण समिती'चे अध्यक्ष तथा तहसीलदार रमेश जसवंत यांनी तसेच ग्रामसेवक, पो.पाटील,कोतवाल, कृषी सहाय्यक, सरपंच,तलाठी,शेतकरी व पशुधन अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांची बैठक घेऊन आजाराविषयी सविस्तर चर्चा करून तहसीलदार रमेश जसवंत यांनी मार्गदर्शन केले.

याबाबत प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, तालुक्यामध्ये ७१,५०० गाय व म्हैस वर्गीय जनावरे आहेत. लंपी हा विषाणूजन्य रोग गायी व म्हशींमध्ये आढळतो. या रोगात पशुंना ताप येणे, पूर्ण शरीरावर 10 ते 15 मि.मी. व्यासाच्या कडक गाठी येतात व तोंडात, नाकात व डोळ्यांत व्रण येतात. सदरचा विषाणूजन्य रोग प्रादुर्भाव विविध प्रकारचे कीटक गोचिड, गोमाश्या इत्यादीं



मार्फत जलद प्रसार होतो. तालुक्याच्या सीमेवरील औरंगाबाद व पुणे जिल्ह्यात या रोगाची साथ वाढत असल्याने करमाळा पशुसंवर्धन विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना सदर रोगाच्या अनुषंगाने सतर्क राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या रोगाला घाबरून न जाता पशुंमध्ये या रोगाची लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या पशुवैद्यकीय संस्थेत कळवावे.

सध्या सोयगाव पूर्ण तालुक्यात मोफत लम्पी स्क्रीन लसीकरण मोहीम मोफत चालू आहे. शेतकऱ्यांनी जनावरांना लसीकरण करून घ्यावे. बाधित जनावरे वेगळी बांधावीत. त्यांचे चारा / पाणी व इतर अनुषंगिक साहित्य सुद्धा वेगळे ठेवावे. प्रथम निरोगी जनावरे यांना चारा-पाणी करावे व नंतर बाधित जनावरे यांच्याकडे जावे आणि त्यांचा चारापाणी करून घ्यावे. बाधित जनावरे यांच्यावर पशुवैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या सल्ल्यानुसार त्वरित औषधोपचार सुरू करावेत. गोठा व लगतच्या परिसरात डास, माशा, कीटक व गोचिड यांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी डेल्टामेथ्रिन, सायपरमेथ्रिन सारखी औषधे पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचे मार्गदर्शनानुसार वापरावीत. सदर रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी पशुपालकांनी घाबरून न जाता जागरूक होण्याचे व नमूद प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत यांनी केले आहे.

याप्रसंगी सोयगाव तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी विनोद चव्हाण, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी,ग्रामसेवक, सरपंच, पो.पाटील, तलाठी, कृषी सहाय्यक, कोतवाल,कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पैठण शहरात बसवणार १०० सीसीटीव्ही कॅमेरे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** ऐतिहासिक तथा धार्मिक पर्यटन स्थळ असलेल्या पैठण शहरात आता १०० सि.सि.टि.व्हि कॅमेराची नजर असणार आहे त्यासंदर्भात शुक्रवार रोजी माजी सभापती विलासबापु भुमरे यांनी पाहणी केली. रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांच्या प्रयत्नामुळे पैठण शहर आता सि.सि.टि.व्हि. कॅमेरामुळे सुरक्षित राहणार आहे. कॅमेरे कुठे कुठे बसवण्यात यावे यासाठी शासकीय यंत्रणा व शहरातील व्यापारी व नागरिकांना भेटुन शाळा,महाविद्यालय, व्यापारी पेठ, बस स्टँड,नाथ महाराज मंदिर परिसर व गजबजलेल्या ठिकाणी कॅमेराच्या माध्यमातून आता यापुढे नजर ठेवण्यात येणार आहे. यावेळी माजी सभापती विलासबापु सोबत व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष पवन लोहीया, अध्यक्ष ज्ञानेश्वर ऊगले, सचिव रामेश्वर सुसे, बलराम लोळगे, शहराध्यक्ष तुषार पाटील, प्रशांत जगदाळे,उमेश तट्टू, बाळासाहेब माने,मनिष औटे, बाळासाहेब पठाडे, स्वदेश पांडे, जालिंदर अडसूळ यांची उपस्थिती होती.



# माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी कृषी विभागाच्या उपक्रमातून बनोटी येथे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

सोयगाव : राज्यात दिनांक ०१ सप्टेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत मराठवाडा व विदर्भ विभागातील शेतकऱ्यांच्या नैराश्य व त्यातून उद्भवणाऱ्या आत्महत्या यावर प्रभावीपणे उपाययोजना करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत तसेच बळीराजाला सुखाचे दिवस यावेत याकरिता “ माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी ” या उपक्रमाची सुरुवात प्रत्येक तालुक्यात करण्यात आली आहे.

त्यानुसार सोयगांव तालुक्यात आज दि.17-09-2022 रोजी मौजे बनोटी येथे कृषि विभाग व आत्मा यंत्रणा यांचे मार्फत विविध घटकांचे आयोजन करण्यात आले होते.आजच्या कार्यक्रमात प्रामुख्याने महसूल, जलसंधारण, ग्रामविकास, वीज खात्याच्या संदर्भातील अडचणी याबाबत चर्चा, पतपुरवठा व सामाजिक सुरक्षा, तंत्रज्ञान प्रसार, पिक वैविधिकरण तसेच शेतकऱ्यांना मार्केटशी जोडणे या विषयी आवश्यक त्या उपाययोजना याविषयी सरपंच व गावातील प्रगतशील शेतकरी तसेच उपसरपंच यांचेशी चर्चा करून गावचा प्रगतीचा आलेख सुधारण्याविषयी नियोजन करण्यात आले.आजच्या कार्यक्रमात एस. जी. वाघ तालुका कृषि अधिकारी सोयगांव प्रत्यक्ष बांधावर जाऊन कापूस व मका पिकाविषयी माहिती देऊन कृषि विविध योजनांचा लाभ घेण्याविषयी मार्गदर्शन केले. एच. बी. देशमुख कृषि पर्यवेक्षक यांनी महाडीबीटी, पिकविमा, ई पिक पहाणी याविषयी मार्गदर्शन केले, एस.एस. पाटील कृषि सहाय्यक बनोटी यांनी कापूस व मका पिकावरील किड व रोग याविषयी करावयाच्या उपाययोजना याविषयी माहिती दिली तसेच ए. एस. महाजन बी. टी. एम. सोयगांव यांनी शेतकरी गट व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती दिली.

तसेच बनोटी येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेस भेट देऊन शेतकरी हिताच्या बँकेच्या विविध योजनांची माहिती घेतली.

# अनाड सोसायटीवर शिवसेनेचे एकहाती वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** सिल्लोड तालुक्यातील अनाड येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी योगेश विजयसिंग पवार, तर व्हाईस चेअरमनपदी माजी सरपंच आत्माराम नारायण मुके यांची ता.16 रोजी बिनविरोध निवड झाली असून सोसायटीचे संचालक म्हणून उत्तमसिंग पवार, सुपडा काळे, उत्तम दिवाणसिंग पवार, शेख कलिम मो.इस्माईल, अब्दुल वसीम, शेख नौमान अ. उस्मान, मुखत्यारसिंग पवार, जेमकोरबाई पवार, उषाबाई पवार, अंजनाबाई बिरारे आदींची निवड झाली आहे. ही निवड प्रक्रिया सहाय्यक निबंधक ज्ञानेश्वर मातेरे, यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यासी अधिकारी सी.जी.काथार यांनी पार पाडली. निवड झालेल्या सर्वांचे अनाड ग्रामपंचायत कार्यालय, गावकऱ्यांच्या वतीने अभिनंदन केले.




# गट विकास अधिकाऱ्यांनी शहीद जवान जाधव यांना वाहिली आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पंचायत समिती कार्यालय येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाल्या नंतर कन्नड तालुक्यातील पिशोर येथील शहीद जवान सुनील जाधव यांच्या निधनाने संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली असुन मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पंचायत समिती कार्यालय येथे गट विकास अधिकारी चंद्रहार ढोकणे त्यांच्या पत्नी वैशाली ढोकणे व गट शिक्षण अधिकारी दिलीप शिरसाठ चिकलठान येथील माजी सैनिकांनी पिशोर येथील शहीद जवानास आदरांजली देण्यात आली



या वेळी गटविकास अधिकारी बोलतांनी म्हणाले की प्रत्येकांने पिशोर येथील शहीद जवान जाधव यांच्या घरी जाऊन सांत्वन करावे व यथा शक्ती आपआपल्या पध्दतीने मदत करावी अशी भावनिक साध आपल्या कार्यलयीन कर्मचारी यांना घातली या वेळी गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे पत्नी वैशाली ढोकणे,गटशिक्षण अधिकारी दिलीप शिरसाठ,साहयक विस्तार अधिकारी एस .डी. चव्हाण,विस्तार अधिकारी संतोष दारकोंडे, प्र . अ .हरीओम कोलमवाड, पं . कृ . अ . दिनकर जाधव, राम बेंबरे, विकास चौधे, माजी सैनिक लक्ष्मण चव्हाण ,नानासाहेब चव्हाण, केशव रौळे, विजय वासने, विजय काटे, उत्तम गिरी, योगेश मिसाळ, मनोज खैरणार, संदिप चव्हाण, एन डी किरतकर, कल्पेश राठोड इत्यादी अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थीती होती.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in